नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



चंदनापरी तू झिजुनी कष्ट सोसलेस...
मानव मुक्तीसाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचणारे महामानव, भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!!

* वर्ष ५५ * अंक १६ * * नागपूर * सोमवार, दिनांक १४ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्रलेख

## खरीखरी..

## पेट्रोल-डिझेलच्या ज्वाला

आम्ही या स्तंभात यापूर्वी अनेक वेळा डिझेल आणि पेट्रोल यांच्या भावाबाबतीत चर्चा केलेली होती. आताही गेल्या अनेक वर्षांपासून क्रूड ऑइल प्रति बॅरल 60 ते 65 रुपये प्रति डॉलर स्थिर आहे. दहा वर्षांच्या पूर्वीपर्यंत क्रूड ऑइलचे भाव वाढले, तर त्याच्या किमती वाढतील. तसे डिझेल - पेट्रोलचे भाव वाढत होते आणि किमती कमी झाल्या की त्याचे भाव कमी होत होते. म्हणजे हे सर्व गणित आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रूड ऑइलच्या किमतीवर अवलंबून होते. हाच दर 90 च्या वर असतानाही जनतेला पेट्रोल डिझेल 60 ते 70 रुपये प्रति लिटर प्रमाणे तेव्हा मिळत होते. त्यावेळी केंद्र सरकार किती पैसे वसूल करीत होते. याचा शोध घेतल्यावर असे लक्षात आले की, त्यावेळी सुद्धा ते कर फार्फार चार-पाच रुपयांच्या वर नव्हते, ही वस्तुस्थिती समजली. आता क्रूड ऑइलचे दर कमी झाल्यावर केंद्र सरकार जवळजवळ 22 रुपये टॅक्स वसूल करते. तर राज्य सरकारही पूर्वीच्या तुलनेत अनेक पटीने टॅक्स वसूल करत आहेत. आम्ही यापूर्वी अनेकदा म्हटल्याप्रमाणे जनतेला पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीमध्ये कधीच कमी झालेली दिसत नाही. या सर्व उचापतीमुळे किंवा उच्च आपत्तींमुळे डिझेल आणि पेट्रोल विकणाऱ्या कंपन्यांना प्रतिलिटर 12 ते 15 रुपयांचा नफा म्हणजेच फायदा होत आहे. याचा अर्थ 22 रुपये केंद्र सरकारचा कर, सात-आठ रुपये राज्य सरकारचा कर आणि 'लेका उपभोक्त्या, तू आता मर मर मर' अशी ही परिस्थिती आहे. काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारने घरगुती वापराच्या गॅसच्या दरात पन्नास रुपये वाढविले होते. त्याच दिवशी पेट्रोल आणि डिझेलच्या अबकारी करात दोन रुपयांची वाढ केली होती. त्याच वेळी सरकारने जाहीर केलेले होते की, कर वाढला तरी दर वाढवणार नाही. म्हणजेच तो कर कंपन्या देतील. आता आम्हाला सांगा की, पंधरा ते सतरा रुपयांचा फायदा झाल्यावरती कोणीही शहाणा माणूस दोन रुपये अत्यंत आनंदाने देईल. म्हणजे कोणतीही कुरकुर न करता देईल. आता या सर्व कंपन्या अत्यंत आनंदाने हा कर देत आहेत. आपल्या देशात सात ते आठ मोठ्या तेल कंपन्या आहेत. सध्या त्यांचा नफा इतका वाढलेला आहे की, त्यांना तो पैसा ठेवायला जागाच उरलेली नाही. त्या कंपन्यांमध्ये ओएनजीसी, ऑइल इंडिया, गेल इंडिया, एचपीसीएल, बीपीसीएल, आयओसी, आरआयएल या कंपन्यांची गेल्या पाच वर्षात सात लाख कोटी रुपयांची कमाई झालेली आहे. बरं पेट्रोल आणि डिझेलवर जीएसटी लागत नाही. त्यामुळे राज्य सरकारही या माध्यमातून भरपूर पैसा मिळवत आहे. या सरकारी कंपन्यांशिवाय काही खाजगी कंपन्याही आहेत. त्यापैकी अंबानीच्या रिलायन्सनेही या पाच वर्षात 2.86 लाख कोटी रुपये कमावले आहेत. अशा स्थितीत जनता, 'मुकी बिचारी कोणीही हाका' अशा पद्धतीने वागत आहे. एके काळची रणरागिणी असलेली स्मृती इराणी आता विस्मृतीत गेलेली असली. तरी विरोधी पक्षात असताना पेट्रोल, डिझेल किंवा गॅसचे दर वाढले की, ती बिचारी रुद्रावतार धारण करीत असे. अमेठीच्या पराभवानंतर आता त्या बिचारीची बोलतीच बंद झालेली आहे. त्यानंतर येतात. ते प्राणायाम गुरु म्हणजेच रामदेव बाबा. 2014 मध्ये तत्कालीन सरकारवर हेच योगगुरू टीका करत होते. ते सरकार घालवले म्हणजे जनतेला 40 ते 45 रुपये दराने पेट्रोल मिळेल असा त्यांचा दावा होता. आता जर त्या बाबांना विचारले तर ते म्हणतील, मी काही तुम्हाला आश्वासन दिले नव्हते. म्हणजे या सर्व गणिताचे उत्तर एका शून्यात आहे आणि हे एक शून्य म्हणजे जनतेला शून्य फायदा झालेला आहे. पूर्वीच्या काळी या पेट्रोल डिझेल कंपन्यांवरती सरकारचा दबाव होता. आताही सरकार म्हणते की, या भावांवर आमचा अधिकार नाही. आता असेही म्हणतात म्हणजे अधिकृत सूत्रानुसार आलेल्या बातमीप्रमाणे अंबानीची रिलायन्स कंपनी अतिशय उदार होणार आहे. सरकारी दरापेक्षा थोडीशी किंमत कमी करून अंबानी यांचे रिलायन्स जनतेला स्वस्त दरात पेट्रोल आणि डिझेल देणार असल्याचे वृत्त आहे. म्हणजे तेव्हा रशियाकडून स्वस्त दरात तेल खरेदी करून बंदी असलेल्या देशात भारतीय कंपन्यांनी तेच तेल विकले आणि गडगंज नफा कमवला. अजूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या देशातील याच कंपन्यांनी जगभरात आजच्या किमतीत मोठमोठे सौदे केलेले आहेत. आपल्या देशात पेट्रोलचा खप साधारणपणे दरवर्षी पाच हजार कोटी लिटरच्या आसपास आहे. यात आणखीन वाढ होऊ शकते. पण लबालब नफा कमवणा?या कंपन्यांनी कमी झालेल्या दरात क्रूड ऑइल खरेदीचे जाळे विणलेले आहे. आम्ही मायबाप केंद्र आणि राज्य सरकारांना दोन्ही गुडघे टेकून, कमरेत वाकून आणि हात जोडून नम्र विनंती करतो. बिचाऱ्या गरीब जनतेला आणि मध्यमवर्गीय जनतेला तीन ते चार रुपये तरी प्रतिलिटर मागे सवलत द्यावी. आत्ताचा सरकारचा कर कमी न करताही सवलत दिली. तरीही तेल विकणाऱ्या कंपन्यांना भरपूर नफा होईलच. केंद्र सरकारला पेट्रोल आणि डिझेल कंपन्यांच्या नफ्यातून साधारणपणे चार लाख कोटी मिळतात आणि राज्य सरकारकडून तीन ते सव्वा तीन लाख कोटी मिळतात. म्हणजे केंद्र आणि राज्य सरकार जनतेला ज्या अनेक गोष्टी फुकट वाटत आहे. त्याची भरपाई जनतेला महाग कर भावात पेट्रोल विकून सरकार करते आहे, हे उघड आहे. एवढा खटाटोप करूनही सरकार काही ऐकणार नाही. हेही आम्हाला ठाऊक आहे आपण भिकारी आहोत म्हणून ही भीक मागितली आहे. न्याय द्यावा, ही विनंती करण्यात काही गैर नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# विजेचे बिल कमी होणार!

## शेतकऱ्यांना दिवसा १० तास वीज : मुख्यमंत्र्यांची घोषणा

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. १३ :

शेतकऱ्यांना दिवसभर शेतीसाठी वीज दिली जाणार असून, महाराष्ट्रात दरवर्षी विजेचे बिल कमी होतील, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

वर्धा जिल्ह्याच्या आर्वी येथे एका कार्यक्रमात ते बोलत होते. फडणवीस म्हणले, महाराष्ट्र देशातील पहिले असे राज्य ठरले आहे, की ज्या राज्याने विजेचे बिल दर ५ वर्षांनी कमी करून दाखवले आहे. लोअर वर्धा प्रकल्पावर पाचशे मेगा वॅट वीज निर्मिती प्रकल्प उभारला जात आहे. वर्धा जिल्हा सौर उर्जेच्या बाबतीत पूर्णतः स्वयंपूर्ण होईल. तर, नेरी मिझार्पुर गावाला संपूर्ण सौर ऊर्जा देण्यात आली आहे, असे म्हणत फडणवीस यांनी येथील गावकऱ्यांचे अभिनंदन केले.



फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांना दिवसभर शेतीसाठी वीज देऊ अशी घोषणा केली होती. ८० टक्के महाराष्ट्रात आता लवकरच दिवसा १० तास वीज उपलब्ध करून दिली जाईल. विहीर पुनर्भरण ही योजना जर हातात घेतली तर त्याचा फायदा होईल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि शिवराजसिंह चौहान यांनी प्रत्येकाला घर देण्यासाठी पाऊल उचलले आहे. घराकरिता २ लाख रुपये मिळतील हा निर्णय आपण केला आहे, प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रत्येक घरावर सोलर लागेल. त्यामुळे, नागरिकांना मोफत वीज मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

फडणवीस म्हणाले, ज्या मागण्या आर्वीसाठी आमदारांनी, खासदारांनी केल्या आहेत त्यावर मला विचार करावाच लागेल. बार्शी उपसा सिंचन योजनेच्या फाईलवर सही मी करून येथे आलो आहे, शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. नवीन रस्त्यामुळे कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून दिली जाईल. रोजगार उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे.

याप्रसंगी पालकमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर, खासदार अमर काळे, आमदार दादाराव केचे, समीर कुणावार, राजेश बकाने, माजी खासदार रामदास तडस प्रामुख्याने उपस्थित होते.

विदर्भात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येते आहे. जवळपास ७ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. भविष्यात वर्धा जिल्ह्यासाठी ही फायद्याची असल्याचे ते म्हणाले.

## भूषण गवई होणार सरन्यायाधीश

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १३ :

१४ मे रोजी घेणार शपथ



देशाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचा वारसा निश्चित झाला आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध विधिज्ञ आणि आंबेडकरी चळवळीचा वारसा लाभलेले अमरावतीचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई देशाचे सरन्यायाधीश होणार आहे. ते ५२ वे सरन्यायाधीश म्हणून १४ मे रोजी शपथ घेणार आहेत.

राष्ट्रपती द्रोपती मुर्मू त्यांना सरन्यायाधीश पदाची शपथ देतील. भूषण गवई हे रा.सु. गवई आणि कमलाताई गवई यांचे पुत्र आहेत.

## हिट ॲन्ड रनमध्ये तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

आऊटर रिंग रोडवर पांजरी टोल नाक्याजवळ एक तरुण हिट ॲन्ड रनला बळी पडला. गंभीर जखमी तरुणाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. पवन संतोष गोंडाळे (२४) असे मृताचे नाव आहे.

पवन आऊटर रिंगरोडने जात असताना पांजरी टोल नाक्याजवळ व्हीला ओयो हॉटेलसमोरून रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनाने धडक दिली.

## पतीनेच केली डॉक्टर पत्नीची हत्या

### चारित्र्याच्या संशयावरून भावासोबत मिळून केला गेम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

छत्तीसगढ राज्यात डॉक्टर असलेल्या पतीने भावासोबत मिळून डॉक्टर पत्नीची हत्या केली. पतीने हातपाय बांधून ठेवले तर भावाने डोक्यावर रॉड मारला. तिच्या मृत्यूची खात्री पटल्यानंतर दोघेही आपआपल्या गावी निघून गेले. ही घटना ९ एप्रिलला घडली.

पती तीन दिवसांनी म्हणजे शनिवार १२ एप्रिल रोजी नागपुरात आला आणि पत्नीची हत्या झाल्याचा कांगावा केला. अर्चना अनिल राहुले (५०) रा. लाडीकर लेआउट असे मृत महिलेचे नाव आहे. अर्चनाचा पती डॉ. अनिल शिवशंकर राहुले (५१) आणि राजू शिवशंकर राहुले (५८) रा. खैरलांजी, साकोली अशी आरोपींची नावे आहेत.

शनिवारी रात्री डॉ. अर्चना अनिल राहुले मृतावस्थेत आढळल्या होत्या. त्यांच्या डोक्यावर जड वस्तूने मारण्यात आले होते. अर्चना मेडिकल रुग्णालयात फिजिओथेरपीस्ट विभागात सहाय्यक प्राध्यापक होत्या. पती अनिल हा रायपूर येथे डॉक्टर आहे. तर त्याचा भाऊ राजू राहुले साकोली येथे राहतो. अनिलला एक मुलगा आहे. तो करीमनगर येथे एमबीबीएसला शिकतो.

अनिल शनिवार, रविवारला घरी येत होता. चारित्र्यावर संशय घेत तिच्याशी भांडण करायचा. आई बाबांचे पटत नाही, याची मुलासही कुणकुण होती. अर्चनाचा परिसरातील लोकांशी फारसा संबध नव्हता.

शनिवारी अनिलने पत्नीच्या मोबाईलवर फोन केला. फोनवर प्रतिसाद मिळत नसल्याचे शेजाऱ्यांना फोन करून सांगितले. मात्र, शेजारी बाहेरगावी असल्याने स्वतः अनिल नागपुरात आला.

दार उघडले आणि रडत घराबाहेर निघाला. शेजाऱ्यांनी विचारपूस केली असता अज्ञात व्यक्तीने अर्चनाची हत्या केल्याचे त्याने सांगितले. शेजारच्यांनी लगेच पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती दिली. वपोनि भेदोडकर पथकासह घटनास्थळी पोहोचले. घरातील कोणतीही वस्तू चोरी झाली नव्हती. अर्चनाचे दोन्ही फोनही घरीच होते.

**कायमचा संपविण्याची योजना**

गत ८ मार्च रोजी अनिल खैरलांजीला गेला. मोठा भाऊ राजूला विश्वासात घेऊन अर्चनाचे कोणाशीतरी अनैतिक संबंध असल्याचे सांगितले. तिला आक्षेपार्ह अवस्थेत पाहिल्याचीही माहिती दिली. कुटुंबाची बदनामी होत असल्याचे सांगून राजूला आपल्या कटात सामील करून घेतले. त्यानंतर अर्चनाला संपविण्याची योजना आखली. योजनेनुसार ९ मार्च रोजी अनिल भावासोबत नागपुरात आला. अर्चनाच्या चारित्र्यावर संशय घेऊन पुन्हा त्यांच्याशी वाद घातला. भांडणादरम्यान अचानक अनिलने तिला खाली पाडून हातपाय बांधले, तर राजूने तिच्या डोक्यावर रॉडने वार केला. तिचा मृत्यू झाल्याची खात्री पटल्यानंतर दोघेही आपआपल्या गावी निघून गेले.


कॉल डिटेल्स आणि लोकेशनवरून तो खैरलांजी आणि नागपुरात असल्याचे समोर आले. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी मोठा मानसिक धक्का बसल्याचा देखावा करीत होता. पोलिसांनी खाक्या दाखवताच त्याने गुन्हा कबूल केला. राजूसोबत मिळून खून केल्याचे सांगितले. पोलिसांनी राजूलाही अटक केली. रविवारी दुपारी दोघांनाही न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना १७ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या खुनात आणखी कोण सहभागी आहे. या संपूर्ण बाबींचा तपास केला जात आहे.

पोलिसांनी तत्काळ कॉल डिटेल्स काढले आणि पहिला संशय अनिलवरच आला.

या दरम्यान अर्चनाची बहीण डॉ. नीमा सोनार घटनास्थळी पोहोचल्या. त्यांनी पोलिसांनी सांगितले की, अनिल पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन भांडण करीत होता. त्याने तिला मारण्याचीही धमकी दिली होती.

पोलिसांनी अनिलची चौकशी सुरू केली. त्याने सांगितले की, तो सतत ३ दिवसांपासून अर्चनाशी फोनवर संपर्क करण्याचा प्रयत्न करीत होता. मात्र प्रतिसाद मिळत नसल्याने त्याला नागपुरात यावे लागले.

## निळ्या पाखरांनी फुलला संविधान चौक



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

निळ्या गुलालाची उधळण, ढोल-ताशांचा गजर आणि फटाक्यांच्या आतषबाजीत इंदोरा बुद्धविहारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर धम्मज्योत मिरवणूक काढण्यात आली.

दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या मार्गदर्शनात निघालेल्या मिरवणुकीत हजारो धम्म बांधव सहभागी होते. भदंत ससाई यांच्या हस्ते बाराच्या ठोक्याला केक कापण्यात आला.

अनुयायांच्या गर्दीने रस्ते फुलले होते. लखख अशा रोषणाईने मध्यरात्री दिवस असल्याचा भास होत होता. संविधान चौक निळ्या पाखरांनी फुलला होता.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला इंदोरा बुद्धविहार, अखिल भारतीय धम्मसेना आणि आंबेडकरी अनुयायींच्या संयुक्त वतीने निघालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर धम्मज्योत मिरवणुकीत उपासक, उपासिका आणि अनुयायी पांढरे वस्त्र परिधान करून सहभागी झाले होते. तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब यांचे छायाचित्र असलेले तसेच इतर देखाव्यांचे चित्ररथ मिरवणुकीत सहभागी झाले होते. पंचशील ध्वज, निळी टोपी लक्ष वेधून घेत होती.?

**पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त**

शहराच्या कानाकोपऱ्यातील बुद्धविहार समितीतर्फे मिरवणुका काढण्यात आल्या. चारही भागातील मिरवणुका संविधान चौकात पोहोचल्या.

रात्री ८ वाजतानंतर कामठी मार्गावर लक्ष जाईल तिकडे पंचशील ध्वज आणि निळी टोपी घातलेले धम्म बांधव दिसून येत होते. अनुयायांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार असल्याने पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी विशेष बैठक घेऊन संविधान चौकासह ठिकठिकाणी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवला. रात्री उशिरापर्यंत ते सुरक्षा व्यवस्थेवर लक्ष ठेवून होते. दरम्यान, शहरात ही मिरवणूक शांततेत पार पडली.

बुद्धं शरणं गच्छामी। धम्मं शरणं गच्छामी। संघं शरणं गच्छामी। बुद्धवंदना म्हणत मिरवणूक इंदोरा चौक, कामठी मार्ग, गड्डीगोदाम, लिबर्टी टॉकीज मार्गाने संविधान चौकात पोहोचली.

भदंत ससाई यांच्या हस्ते संविधान चौकातील बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बुद्धवंदनेनंतर ससाईंनी अनुयायांना मार्गदर्शन केले.

यासोबतच शहरातील प्रत्येक बुद्धविहारातून निघालेली मिरवणूक रात्री १२ वाजेपर्यंत









# शिंदे, अमित शहांमध्ये बंद दाराआड चर्चा

### भरत गोगावलेंना तातडीने मुंबईला पाचारण, पडद्यामागील घडामोडींना वेग



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :** अमित शहा आणि एकनाथ शिंदे यांच्यामध्ये आज सह्याद्री अतिथीगृहावर अर्धा तास बंद दाराआड चर्चा झाली. या चचेनंतर रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदासाठी इच्छुक असणारे शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांना एकनाथ शिंदे यांनी तातडीने मुंबईला बोलावून घेतले. त्यामुळे आता मुंबईत रायगडच्या पालकमंत्रिपदाबाबत निर्णायक चर्चा होणार का, याकडे लक्ष लागले आहे.

रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून महायुतीत वाद सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसला जाण्यापूर्वी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रिपदावरून शिंदे नाराज झाले आणि देवेंद्र फडणवीसांनी दोन्ही नावांना स्थगिती दिली.

रायगडमध्ये शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले हे पालकमंत्रिपदासाठी इच्छुक आहेत, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून अदिती तटकरे यांच्या नावाची चर्चा आहे. त्यातच काल अमित शहा हे रायगडला पोहोचल्यानंतर थेट सुनील तटकरे यांच्या घरी गेल्याने विविध चर्चांना उधाण आले. भरत गोगावले यांना तटकरे यांच्या घरी जेवणाचे निमंत्रण असताना देखील त्यांनी दांडी मारली होती.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सकाळी अमित शहा यांची सह्याद्री अतिथीगृहावर भेट घेतली. या भेटीत दोघांमध्ये बंद दाराआड अर्धा तास चर्चा झाली. यावेळी एकनाथ शिंदे यांच्यासोबत कुणीही नव्हते. विशेष म्हणजे या भेटीवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील उपस्थित नव्हते.

या भेटीनंतर एकनाथ शिंदे यांनी भरत गोगावलेंना तातडीने मुंबईला बोलावून घेतले. अमित शाह यांनी रायगडच्या पालकमंत्रीपदाबाबत एकनाथ शिंदे यांना काही संदेश दिला असावा का? याविषयी तर्कवितर्क लढवले जात आहेत.

एकनाथ शिंदेंनी तातडीने मुंबईला बोलावण्याबाबत भरत गोगावले यांना विचारले असता, पक्षाच्या कामासाठी शिंदेंनी बोलावले आहे. पक्षाच्या काही गोष्टी असतात, शेवटी पक्षबांधणी आणि पक्ष वाढवणे महत्वाचे आहे आणि जी काही जबाबदारी आमच्यावर दिली आहे ती आम्हाला पार पाडायची आहे, असे भरत गोगावले म्हणाले.

अमित शाह आणि सुनील तटकरे यांच्यात जेवणावेळी रायगडच्या पालकमंत्रीपदाबाबत चर्चा झाली आहे का, असा प्रश्न भरत गोगावले यांना विचारला असता, आम्ही त्या ठिकाणी उपस्थित नव्हतो. परंतु आम्ही काल त्यांच्या सोबत असलेल्या लोकांना यासंदर्भात चर्चा झाली का, असे विचारले असता अशा प्रकारची कोणतीही चर्चा झाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

सुनील तटकरे यांच्या निवासस्थानी काल अमित शहा यांच्यासोबत फक्त फोटोसेशन आणि भोजनाव्यतिरिक काहीच झाले नाही. सुनील तटकरे यांनी अमित शहा यांना दिल्लीत माझे घर तुमच्या रायगड दौऱ्यावेळी रस्त्यात लागेल. त्यामुळे तुम्ही तिकडे या, असे निमंत्रण दिले होते. त्यामुळे त्यांच्या निमंत्रणाला मान देऊन अमित शहा काल सुतारवाडीत गेले, असा दावा भरत गोगावले यांनी केला.

## राऊत हे जळणारं लाकूड...



■ **मुंबई :** रायगडमध्ये असताना केंद्रीय मंत्री अमित शाहा यांनी औरंगजेबाच्या कबरीविषयी भाष्य केले. त्यांच्या याच भाषणाचा आधार घेत खासदार संजय राऊत यांनी शाहा यांच्यावर सडकून टीका केली. अमित शाहांनी औरंगजेबाच्या थडग्याला समाधीचा दर्जा दिला, असं राऊतांनी म्हटले. यावरच आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते तथा खासदार नरेश म्हस्के यांनी राऊतांना चांगलंच घेरलं.

संजय राऊत हे जळणारे लाकूड आहेत, असं नरेश म्हस्के यांनी म्हटले. संजय राऊत यांच्या वरून खालून धूर निघतो. राऊत हे जळणारे लाकुड आहेत. एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत असलेल्या मंडळींवर ते जळत आहेत. राऊत यांच्या वरून धूर निघतोय, खालून धूर निघतोय. राऊत यांनी जे वक्तव्य केलंय, त्याकडे लक्ष देण्याची गरज नाही. नेहरू, गांधी घराणेशाहीशी त्यांनी हातमिळवणी केली आहे. सत्तेसाठी त्यांनी ही हातमिळवणी केली आहे. त्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल बोलण्याचा काय अधिकार आहे? असा सवाल नरेश म्हस्के यांनी केला.

निवडणुकीच्या मिरवणुकीत पाकिस्तानचे झेंडे नाचवणारे हे संजय राऊत आणि उ.भा.ठा आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल प्रेम व्यक्त करतात. हा अधिकार त्यांनी केव्हाच गमावलेला आहे, असा हल्लाबोलही नरेश म्हस्के यांनी केला. गाढवालादेखील अक्कल आहे पणङ्खतहव्वूर राणाला भारतात आल्यानंतर तुम्ही नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करता. गाढवालादेखील अक्कल आहे. पण तुमची अक्कल कुठे गेली? असा सवाल मस्के यांनी केला.

## तेव्हा लोक माझ्या कानात....



■ **नांदेड :** राम शिंदे यांची विधान परिषदेच्या सभापतीपदी निवड झाल्याबद्दल नांदेडमध्ये त्यांचा भव्य असा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला खासदार अशोक चव्हाण, शिवसेनेचे आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंद तिडके, आमदार बाबुराव कदम, भाजपाचे आमदार श्रीजया चव्हाण यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात बोलताना भाजप नेते अशोक चव्हाण यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

मला जेव्हा रोहित पवारांनी बोलावलं होतं, तेव्हा मी कर्जत जामखेड मतदारसंघात गेलो होतो तेव्हा मी दुसऱ्या पक्षात होतो. पण तेव्हा लोक मला कानात सांगत होते, साहेब या ठिकाणी खरा माणूस राम शिंदेंच आहे, असं अशोक चव्हाण यांनी म्हटलं आहे.

नांदेडमध्ये कृषी महाविद्यालय झाले पाहिजे, यासाठी मी चीफ सेक्रेटरी यांच्याकडे गेलो होतो. तेव्हा चीप सेक्रेटरी म्हणाले, हे होणार नाही. मी त्यांना सांगितलं निर्णय मुख्यमंत्री घेत असतात चीप सेक्रेटरी नाही. तेव्हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते, त्यांनी यासंदर्भात निगेटिव्ह शेरा दिला होता. त्यानंतर आमचं सरकार गेलं. शेवटी ती फाईल पुढे आमदार बालाजी कल्याणकर यांनी नेली आणि एकनाथ शिंदे यांनी ते काम केलं, असंही यावेळी चव्हाण यांनी म्हटलं आहे.

## मुंबईमध्ये उद्धव ठाकरेंना धक्का



■ **मुंबई :** उद्धव ठाकरे गटाला मुंबईत अजून एक धक्का बसला आहे. मुंबईतील माजी नगरसेविका तथा ठाकरे गटाच्या प्रवक्त्या संजना घाडी यांनी ठाकरे गटाला शेवटचा जय महाराष्ट्र ठोकला आहे. गेली काही दिवस त्या नाराज होत्या. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत त्यांनी शिवसेना प्रवेश करत असल्याचे सांगितले. दरम्यान ठाकरे गटाने प्रवक्त्यांची यादी जाहीर केली यामध्ये त्यांना स्थान देण्यात आले नाही. अगदी शेवटच्या क्षणी त्यांचे नाव यादीत घेण्यात आले. यामुळे त्या नाराज होत्या. मी एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्वीकारत आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

संजय घाडी आणि संजना घाडी हे दोघेही शिवसेना ठाकरे गटाचा बोरिवली-मागाठणे परिसरातील चेहरे होते. आता, पती-पत्नींनी शिवसेना ठाकरे गटाचे शिवबंधन सोडत थेट एकनाथ शिंदे यांची साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. दोघेही पती पत्नी हे मुंबई महापालिकेत नगरसेवक राहीले आहेत. त्यांचे पती माजी नगरसेवक संजय घाडी यांनी देखील शिवसेनेत प्रवेश केला आहे.

## कोण खैरै? त्यांना कोण ओळखतं?



**छत्रपती संभाजीनगर :** खासदार संदिपान भुमरे यांनी जिल्ह्याचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांच्यावर सडकून टीका केली आहे. खैरे यांना आता कोणीही विचारत नाही. त्यांनी घरी बसून नातवंडे सांभाळावीत, छत्रपती संभाजीनगर शहराला लवकरच पाणीपुरवठा सुरू होणार आहे, या कामाचं श्रेय घेण्यासाठाची आदित्य ठाकरे आणि त्यांचा शिवसेना पक्ष आंदोलन करत आहेत, असं त्यांनी म्हटले.

चार वर्षांपूर्वी मुख्यमंत्रिपदावर उद्धव ठाकरे होते. त्यांनी लक्ष घातले नाही, त्यामुळे पाणीपुरवठ्याची योजना पूर्ण झाली नाही. उद्धव ठाकरे यांच्या काळात योजना पूर्ण झाली नाही म्हणून लोकांचे हाल झाले,ह्व असा आरोपही संदिपान भुमरे यांनी केला.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी छत्रपती संभाजीनगरला पाणीपुरठवा करणाऱ्या योजनेसाठी निधी उपलब्ध करून दिला. चंद्रकांत खैरे हा ढोंगी माणूस आहे. खैरे यांनी सगळ्या योजनेचा बट्टयाबोळ केला, असा घणाघात भूमरे यांनी केला आहे.

## दर्शन निकाळजे यांना बडतर्फ करुन त्यांच्या संपत्तीची चौकशी करा

### सिटीझन फोरमच्या कऱ्हाडे यांची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. १३ :**

अवैध वाळु साठेबाजी प्रकरणी नागपूरच्या विभागीय आयुक्तांनी (महसुल)केलेल्या चौकशीत उपविभागीय अधिकारी दर्शन निकाळजे दोषी आढळून आल्याने तसेच ते भ्रष्टाचारात लिप्त असल्याचा ठपका ठेवून निलंबित करण्यात आले आहे.

दरम्यान निकाळजे हे परिविक्षाधिन कालावधीत गडचिरोली येथे प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून कार्यरत असतांना त्यांनी सिएमआर मिलींग प्रकरणात प्रचंड गैरव्यवहार करून कोट्यवधीची संपत्ती जमा केली असल्याने निकाळजे यांना सेवेतून बडतर्फ करून त्यांच्या संपत्तीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे मंत्री ना.अजित पवार यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

तक्रारीत कऱ्हाडे यांनी म्हटले आहे की गडचिरोली जिल्ह्यात पणन हंगाम २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्स सोबत तत्कालीन प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी दर्शन निकाळजे यांनी संगनमत करून लगतचे बेसगोदाम न देता जवळपास २५० किलोमीटर लांब दुर अंतरावरील बेसगोदाम देऊन धान व तांदुळ वाहतुकीत प्रचंड गैरव्यवहार करून शासनाचे कोट्यावधी रुपयाचे नुकसान केले आहे.त्यांनी आपल्या सेवाकाळात जिल्ह्याच्या आरमोरी तालुक्यातील देलनवाडी व कुरंडी या शासकीय धान खरेदी केंद्रावरील धान लगतच्या आरमोरी व देसाईगंज तालुक्यात सिएमआर मिलींग करणारे राईसमिल असतांना पदाचा दुरुपयोग करून जवळपास २५० किलोमीटर लांब दुर अंतरावर असलेल्या सिरोंचा तालुक्यातील रामानुजपुर येथील नारायण ॲग्रो इंडस्ट्रीजला भरडाई करीता देऊन धान वाहतुकीत शासनाच्या कोट्यावधी रुपयाचे नुकसान केले आहे.

तसेच भरडाई केलेला तांदुळ जमा करतांना जवळचा चामोर्शी येथील बेसगोदाम सोडून जवळपास २५० किलोमीटर लांब दुर अंतरावर असलेल्या आरमोरी येथील बेसगोदामात जमा करून तांदुळ वाहतुकीतही प्रचंड घोटाळा करून शासनाची कोट्यावधी रुपयाने फसवणूक केली आहे.

निकाळजे यांच्या सेवाकाळात गडचिरोली जिल्ह्यातील सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्स सोबत संगनमत करून जवळपास सर्वच राईसमिल सोबत असेच प्रकार करून शासनाची कोट्यावधी रुपयाने फसवणूक केली आहे. निकाळजे हे परिविक्षाधिन कालावधीत गडचिरोली येथे कार्यरत असतांना सिएमआर मिलींग वाहतुक घोटाळ्यात लिप्त असल्याने त्यांनी कोट्यावधिची माया जमविली असल्याची दाट शक्यता लक्षात घेता निकाळजे यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करून त्यांच्या संपत्तीची चौकशी करण्याची मागणी कऱ्हाडे यांनी केली आहे.

## अपघातात एक ठार; चार गंभीर जखमी

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १३ :** बार्शीटाकळी तालुक्यातील पिंजर मार्गावरील दोनद फाट्याजवळील रेडवा टी- पॉइंटवर मिनीट्रकने समोरुन अचानक आलेल्या दोन दुचाकींना जबर धडक देत काही अंतरापर्यंत फरपटत नेले आणि एका झाडावर आदळला.



या भीषण अपघातात एक दुचाकीस्वार जागीच ठार झाला. रमेश मनीराम चौधरी (वय ४३, रा,शिरपूर, मध्यप्रदेश)असे अपघातात ठार झालेल्या व्यक्तीचे नाव आहे तर या अपघातात अन्य चारजण गंभीर जखमी झाले. यातील दुचाकीवरील माय-लेकाची प्रकृती चिंताजनक असून, त्यांच्यावर अकोल्यातील एका खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूरजवळील शिरपूर येथील रहिवासी रमेश मनिराम चौधरी (वय ४३) हे पत्नी व मुलासह दोनद येथील आसरादेवीच्या यात्रेसाठी दोनद जवळील शेलू गावातील नातेवाइकांच्या घरी पाहुणे म्हणून गेले होते.

शुक्रवारी ते यात्रोत्सवात सहकुटुंब फिरले. देव दर्शन घेतले. रात्री मुक्काम केला. सकाळी ते बऱ्हाणपूरसाठी बहीण, भाच्यासह दुचाकीवर निघाले. दुपारी ऊन जास्त वाढते म्हणून ते सकाळी निघाले. घरातून ते बाहेर पडत नाही तोच अर्ध्या तासाने त्यांच्या अपघाताची बातमी कळाली. अपघातात जावाई ठार झाले. तर बहीण, लहान भाचा गंभीर जखमी आहेत.

## हिंगोलीत काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षांचा राजीनामा

■ **वृत्तसंस्था, हिंगोली, दि. १३ :**

हिंगोली जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष दिलीप देसाई यांनी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. त्यानंतर शनिवारी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत अनेकांनी जिल्हाध्यक्ष पदासाठी इच्छा बोलून दाखवली. मात्र माजी नगरसेवक अनिल नेनवाणी यांची वर्णी लागणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

हिंगोली जिल्ह्यात काँग्रेसमधे मागील काही दिवसांपासून अंतर्गत धुसफुस सुरु आहे. माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर व विधान परिषद सदस्या डॉ. प्रज्ञा सातव यांचा एक गट असे दोन गट कार्यरत होते. त्यामुळे प्रत्येक वेळी काँग्रेसच्या बैठकीस, आंदोलनास एक गट गैरहजर राहात होता. मात्र या दोन गटामध्ये जिल्हाध्यक्ष दिलीप देसाई यांची मात्र चांगलीच अडचण होत होती. दोन्ही गटांना सांभाळतांना देसाई यांना तारेवरची कसरत करावी लागत होती.

मागील दोन ते अडीच वर्षापासून पक्षाचे जिल्हाध्यक्षपद सांभाळणाऱ्या देसाई यांनी अखेर जिल्हाध्यक्षपदाचा राजिनामा दिला आहे. त्यामुळे पक्षाला चांगलाच धक्का बसला आहे.

## 'नंददीप'च्या तिसऱ्या वर्धापनदिनी साईश्रद्धाकडून मोफत औषधोपचार

### तीस मनोरुग्णांचे मधुमेहाचे निदान



■ **महासागर प्रतिनिधी यवतमाळ, दि. १३ :**

नंददीपच्या उपचाराधीन मनोरुग्णांमध्ये असेलल्या छुप्या आजारांचा शोध घेण्यासाठी आजच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.यातून पुढील उपचार करणे सोयीचे जाईल. या सेवेत जुळल्याने आंतरिक समाधान मिळते,असे उद्गार साईश्रद्धा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. विजयकुमार मून यांनी काढले.

नंददीप बेघर मनोरुग्ण निवारा केंद्राच्या तिसऱ्या वर्धापनदिनाच्या पूर्वदिनी आयोजित मोफत तपासणी शिबिरात ते बोलत होते.याठिकाणी उपचाराधीन असलेल्या १५८ मनोरुग्णांना तपासण्यात आले. उच्चरक्तदाब, मधुमेह, क्षयरोग, त्वचा विकारासोबतच त्यांच्यातील पचनक्रियेशी संबंधित तक्रारींना या तपासणीतून ओळखण्यात आले.

याप्रसंगी बोलताना डॉ. मून म्हणाले की, भरती मनोरुग्णांना असलेल्या छुप्या शारीरिक व्याधींचे निदान झाल्यानंतर त्यांना योग्य उपचार दिले जाईल. पुढे दर तीन महिन्यांनी यासर्वांच्या पुन्हा चाचण्या करून त्यांना निरोगी आरोग्य देण्याचा आमचा प्रयत्न राहील,असे त्यांनी आश्वस्त केले.

या शिबिरातून केवळ तपासणीच नव्हेतर मोफत औषधोपचार आणि उपचारात सातत्य ठेवण्यासाठीचे नियोजन करण्यात आले. केंद्राच्या डॉ.कविता बोरकर यांच्या समन्वयातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले. यासाठी साईश्रद्धाच्या डॉ. पूजा मून, डॉ. आशिष लढे,फार्मासिस्ट सुशांत बाला, परिचारिका अश्विनी कुडमेथे, सुमित चिकटे, अमर खसाळे, सलीम शेख यांनी परिश्रम घेतले.

१४ एप्रिल २०२२ रोजी तत्कालीन मुख्याधिकारी माधुरी मडावी यांच्या प्रयत्नाने संदीप व नंदिनी शिंदे यांच्या मनोरुग्णसेवेला हक्काचे अवकाश मिळाले त्यांची ही सेवा संघटित झाली. मनोरुग्णसेवेची ही लोकचळवळ चौथ्या वर्षाकडे मार्गस्थ होत आहे.आजच्या शिबिरातून तीस मनोरुग्णांना मधुमेहाचे निदान झाले आहे.

## १४ एप्रिलला करणार १४ वृत्तपत्रांचे वाचन

### मृदगंध फाउंडेशनचा १३५ शाळांमध्ये उपक्रम

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १३ :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोमवार, १४ एप्रिलला मृदगंध फाउंडेशनच्या वतीने १४ एप्रिल १४ वृत्तपत्र हे अभियान राबवण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी व स्थानिक, राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावर घडणाऱ्या विविध घडामोडींची त्यांना सदैव माहिती असावी, याकरिता हे अभियान राबवण्यात येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने दर्यापूर तालुक्यातील १३५ शाळांमध्ये हा उपक्रम राबवला जाईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानाचे व अभ्यासाचे आदर्श म्हणून विद्यार्थ्यांसमोर उभे राहावे त्यातून विद्यार्थ्यांना ज्ञान लालसेची प्रेरणा मिळावी, या हेतूने मृदगंध फाउंडेशनने हा उपक्रम हाती घेतला आहे. तालुक्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, खासगी शाळांनी या उपक्रमात सहभागी होऊन बसस्थानक चौकातील वृत्तपत्र विक्रेत्यांकडून सोमवार, १४ एप्रिलला सकाळी ७ वाजता १४ वृत्तपत्र घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने त्या वृत्तपत्राचे अवलोकन करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन मृदगंध फाउंडेशनच्या वतीने परिमल नळकांडे, गौरव पांडे, दीपक उपाध्याय, विकी नांदुरकर, विनायक चव्हाण, कुलदीप शिरभाते, धनंजय जोशी, अनिकेत तळोकार, गौरव बैताडे, गितेश गणोरकर आदींनी केले आहे.

## भाजपची मानसिकता महाराष्ट्रावरील आक्रमणकर्त्यांसारखी

### आदित्य ठाकरे यांचा घणाघात, शिंदेंनाही टोला



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १३ :** ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर नाव न घेता जोरदार निशाणा साधला आहे.

काल पौर्णिमा होती, काल काही लोक गावी पण जाऊन आले असतील, आणि मग ते ज्यांना भेटले त्यांनी थोडी काळजी घ्यावी, आमच्या अनुभवावरून सांगतो. बाकी काही नाही, असा खोचक टोला आदित्य ठाकरे यांनी एकनाथ शिंदेंना लगावला आहे.

मुंबईतील पाणी प्रश्नावर आज शिवसेना ठाकरे गटाची बैठक झाली. या बैठकीनंतर आदित्य ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी मुंबईतील पाणी प्रश्नासह भाष्य करत महायुती सरकारवरही जोरदार हल्लाबोल केला. भाजपची मानसिकता महाराष्ट्रावर आक्रमण करणाऱ्यांसारखीच आहे. आज मुंबई, पुणे, छत्रपती संभाजी नगरची अवस्था पाहा, शेतकरी आणि महिलांची अवस्था पहा, असे वाटते की जसे येथे मुघलांचे राज्य आहे आणि त्याच मानसिकतेचे लोक येथे येऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करतात. असेच लोक औरंगजेबाच्या कबरीला समाधी म्हणतात, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी अमित शहांवर केली.

मुंबईची आर्थिक हत्या होत आहे, मुख्यमंत्री लक्ष देत नाहीतआदित्य ठाकरे मुंबईतील पाणी प्रश्नावर बोलताना म्हणाले, आज आम्ही सगळे शिवसेनेचे जे मुंबईतील स्थानिक नेते आहोत, उपनेते आहेत, विभागप्रमुख, पदाधिकारी, महिला आघाडी सर्वांची बैठक झाली.

गेल्या सहा-सात महिन्यांपासून मुंबईतील पाण्याच्या प्रश्नाबद्दल अनेकदा विषय घेतलेला आहे, मग कुठे गढूळ पाणी असेल, कुठे पाण्याचा दाब कमी असेल. आणि आता उन्हाळ्यात टँकर असोसिएशनने संप पुकारला आहे. आता मुद्दा हा आहे की, संपापूर्वी टँकर असोसिएशनने नोटीस देऊन सुद्धा सरकार काही हलले नाही, मुंबईत महापालिकेतील जे प्रशासक आहेत, ते मुख्यमंत्र्यांच्या आदेशावरच चालतात. मुंबईची आर्थिक हत्या होत आहे, मुख्यमंत्री लक्ष देत नाही, असे ते म्हणाले.

# शांताराम पंदेरे यांच्या 'सम्यक ते वंचित' ग्रंथाचे प्रकाशन




■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १३ :**

इतिहास विसरलो तर वर्तमान परिस्थितीशी लढायला संभ्रम निर्माण होतो. त्यामुळे इतिहास विसरू नका. तो समजून घ्या. आंबेडकरी चळवळीत आपण किती टप्पे गाठले याची जाणीव नसल्याने अनेकदा आपलेच लोक त्या चक्रात अडकतात. पण आपल्याला इतिहास माहिती असेल तर वर्तमान परिस्थिती निर्भिडपणे लढता येते, ती लढण्याची तयारी ठेवा असे आवाहन प्रबुद्ध भारतचे संपादक ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले.

आंबेडकरी चळवळीच्या कालखंडातील महत्त्वाच्या टप्प्यांचा दस्तऐवज असलेले सम्यक ते वंचित : चळवळीचा दस्ताऐवज या शांताराम पंदेरे यांनी संकलित केलेल्या ग्रंथाचे पुण्यातील निळू फुले सभागृहात प्रकाशन झाले. याप्रसंगी ॲड. आंबेडकर बोलत होते.

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी वर्तमान सामाजिक आणि राजकीय परिस्थितीवर अत्यंत स्पष्टपणे भाष्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्याच्या आठवणींना उजाळा देताना, त्यांनी 1977 नंतरच्या राजकीय घडामोडी, रशियाच्या उदाहरणाने दाखवलेली दूरदृष्टी आणि मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनातील सरकारी लाठीमार आणि जनतेमध्ये पसरवलेली दहशत यावर सखोल विवेचन केले.

ॲड. आंबेडकर म्हणाले, मी लोकांमध्ये बसून चर्चा केल्या, भीती दूर करण्यासाठी प्रयत्न केले. त्यातून नाशिक ते मुंबई लॉंग मार्चचा निर्णय झाला आणि त्यातून लोकांचा चळवळीवरचा आत्मविश्वास पुन्हा उभा राहिला. चळवळीत नेमकं काय साधायचं आहे, हे लक्षात ठेवा.

टीकाकारांना घाबरण्याचे कारण नाही. निर्भिडपणे आपले मत मदत रहा. वाचन करून समजून घेणे, निर्णयक्षम होण्यासाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. टीव्हीवर जे दिसते आणि वर्तमानपत्रात जे छापून येते ते तपासून घ्या. लगेच खरे मानू नका, विचार करा, तपासा, असा सल्लाही त्यांनी दिला.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ज. वि. पवार, शांताराम पंदेरे, वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर, ज्येष्ठ नेते वसंतदादा साळवे, ज्येष्ठ पत्रकार प्रा. जयदेव डोळे, प्रा. संजीव चांदोरकर, ॲड. अरुण जाधव, दिशा पिंकी शेख, देवेंद्र उबाळे, पुष्पाताई इंगळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रबुद्ध भारतच्या कार्यकारी संचालक प्रा. अंजली आंबेडकर, युवा नेते सुजात आंबेडकर, राजेंद्र पातोडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या सुरुवातीच्या सामाजिक राजकीय प्रवासापासून सोबत असलेले आणि सम्यक समाज आंदोलन, भारिप, भारिप बहुजन महासंघ आणि वंचित बहुजन आघाडी या संपूर्ण प्रवासातील सहकाऱ्यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

# मालवाहू बोलेरो वाहन उलटून एक ठार, 9 गंभीर



## आष्टगाव ते खानापूर मार्गावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि. 13)** - भरधाव मालवाहू बोलरो वाहन उलटून 1 ठार तर 9 मजूर गंभीर जखमी झाले. यापैकी दोन गंभीर जखमींना अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात रवाना करण्यात आहे. ही घटना 13 एप्रिल रोजी सकाळी 9 वाजताच्या सुमारास आष्टगाव ते खानापूर मार्गावर घडली.

मध्य प्रदेशातील 10 मजूरांना घेऊन मालवाहू पिकअप क्रमांक एमएच 27 एक्स 8601 हे चांदूर बाजार येथील एचजीच्या प्लांटवरून मोर्शीकडे जात होते. दरम्यान खानापूर ते आष्टगावाजवळ अचानक चालकाचे स्टेअरिंगवरील नियंत्रण सुटले आणि मालवाहू पिकअप वाहन उलटले. या अपघातात एका मजूराचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर 9 मजूर जखमी झाले आहे. या अपघातानंतर घटनास्थळी नागरिकांची एकच गर्दी झाली. त्यानंतर एच.जी कंपनीची मालवाहू पिकअप खाली दबलेल्या मजुराला बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु झाले. नागरिकांनी मालवाहू पिकअप वाहन सरळ करून जखमींना बाहेर काढले. परंतू या अपघातात मध्य प्रदेशातील राकेश पाटील (22, रा. मध्यप्रदेश) याचा घटनास्थळीच मृत्यू झाला होता. तर पप्पू काजदे (20), राजा काजळे यांना गंभीर जखमींना तत्काळ पुढील उपचारासाठी अमरावती रवाना करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे अन्य जखमींमध्ये मुजा कासदे, सुनील कासदे, रंगभाऊ श्रीपाद यादव, सालक राम सालवे, लालसिंग कासदे, अर्जुन चिराले (राहणार सर्व मध्यप्रदेश) यांचा समावेश आहे. या गंभीर जखमींवर मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु असून, तेथील डॉ. सचिन कोरडे यांनी जखमींवर उपचार सुरु केले.


# डॉ.पंजाबराव देशमुख विमानतळ नावाचा उल्लेख केल्याने संभ्रम

## विमानतळाला भाऊसाहेबांच्या नावाचा एलाइंस एअरच्या निमंत्रण पत्रात उल्लेख

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती( दि.13 ) - अमरावती विमानतळाला डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे नावे देण्यात आल्याचे एलाइंस एअरने खा. बळवंत वानखडे यांना पाठविलेल्या निमंत्रण पत्रातून स्पष्ट होत आहे. महत्त्वाचे म्हणजे केंद्र व राज्य सरकारकडून नावाच्या अनुषंगाने अजून कोणतीही अधिसूचना निघालेली नाही, हे विशेष! स्थानिक प्रशासनाने सुद्धा दुजोरा दिलेला नाही. विमानतळाला कोणाचे नाव द्यायचे, याची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. सर्व प्रथम प्रद्याचक्षू गुलाबराव महाराज यांचे दिले जाईल, अशी बातमी समोर आली होती.*





Alliance Air Aviation Limited

त्यानंतर काही लोकप्रतिनिधी, श्री शिवाजी शिक्षण संस्था व नागरिकांकडून सदर विमानतळाला डॉ. पंजाबरावांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली. अमरावती अनेक युक्तीवादही त्यासाठी झाले. दरम्यान, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या प्रबंध संचालक स्वाती पांडे यांना नावा संदर्भात शनिवार 12 एप्रिल रोजी विमानतळावरच पत्रकारांनी प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याचा निर्णय घेतील. तो विषय माझा नाही, असे स्पष्टपणे सांगितले होते. कंपनीने जी निमंत्रण पत्रिका तयारी केली आहे, त्यावर डॉ. पंजाबराव देशमुख विमानतळ असा उल्लेख नसून फक्त अमरावती विमानतळ असाच उल्लेख करण्यात आला आहे. त्यामूळे विमानतळाला नेमके नाव कोणते असा संभ्रम पुन्हा एकदा निर्माण झाला आहे.

दुसरीकडे, एलाइंस एअरचे अध्यक्ष अमित कुमार यांच्या स्वाक्षरीने अमरावतीचे खा. बळवंत वानखडे यांना 10 एप्रिल रोजी विमानतळ उद्घाटन कार्यक्रमाचे निमंत्रण पत्र पाठविण्यात आले आहे. ते 13 एप्रिलला समोर आले असून त्यात डॉ. पंजाबराव देशमुख अमरावती विमानतळ असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. 16 एप्रिलच्या उद्घाटन कार्यक्रमाला सकाळी 10.30 वाजता उपस्थित राहण्याचे त्यातून कळविण्यात आले आहे. हे पत्र समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

पण, रविवारी उघड झालेल्या या नव्या घडामोडीला जिल्हा प्रशासनाकडून दुजोरा देण्यात आलेला नाही. राज्य व केंद्र शासनाचे तसे कोणतेही पत्र नाही. मग, एलाइंस एअरने कोणत्या आधारावर आपल्या निमंत्रण पत्रात नावाचा उल्लेख केला आहे, या संदर्भात चर्चा होत आहे.

### या पत्राबाबत नोंदविला आक्षेप

अलायन्स एअरच्या पत्रामध्ये डॉक्टर पंजाबराव देशमुख विमानतळ अमरावती असा उल्लेख आलेला आहे. मात्र अद्यापपर्यंत विमानतळाच्या नावाबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही. अलायन्स एअरतर्फे पाठवण्यात आलेल्या पत्रामध्ये या झालेल्या उल्लेखाबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणतर्फे आक्षेप नोंदविण्यात आला असून याबाबत कंपनीला मेल करण्यात आलेला आहे, असे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने कळविले आहे.

# वृद्धाला 31 लाख 50 हजाराने गंडविले

### सीबीआय असल्याची केली बतावणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** - सीबीआय अधिकारी असल्याची बतावणीने मनीलॉण्ड्रिंगच्या गुन्ह्यात अडकल्याची भिती दाखवून अमरावती शहरातील एका वृद्ध व्यक्तीला 31 लाख 50 हजार रुपयांने गंडविले. याप्रकरणात सायबर पोलिसांनी तोतया दोघा बँक खातेदाराविरुद्ध 11 एप्रिल रोजी फसवणूक, विश्वासघातासह आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमरावती शहरातील सदर वृद्ध व्यक्ती (79) शासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी आहेत. त्यांनी 20 मार्च 2025 रोजी एका मोबाईलधारकाने फोन केला. संपर्क करणाऱ्या मुंबई सीबीआय क्राईम ब्रँचमधून बोलत असल्याची बतावणी केली. सदर वृद्धावर दबाव टाकण्यासाठी एका नरेश नामक व्यक्तीच्या नावाचा उल्लेख करून तो व्यक्ती 538 कोटी रुपयांच्या मनीलॉण्ड्रिंगच्या गुन्ह्यात अडकला असून त्याचा तपास सीबीआयमार्फत सुरू आहे. त्या गुन्ह्यामध्ये आपले नाव (वृद्धाचे) आल्याचे तोतयाने वृद्धास सांगितले. त्यातून वाचायचे असेल, तर सुप्रिम कोर्टात हजर राहून मार्ग काढू शकतो, असे वृद्धास सांगितल्या गेले. आपण कॉल कट करू नका, असा सल्लाही तोतयाने दिला. कुणाजवळ भाष्य करू नका, मुलगा, मुलीसोबतही त्याबाबत बोलू नका, कारण हा मुद्दा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित असल्याचे सांगून तोतया सीबीआय अधिकाऱ्यांनी वृद्धावर अधिक दबाव वाढविला. त्यानंतर संबंधितांनी वृद्धासोबत बोलताना व्हिडिओ कॉल केला तसेच दबाव टाकून धमक्या देत पैसे पाठवायला लावले.

# सरपंचपदासाठी 23, 24 एप्रिल रोजी आरक्षण सोडत

## नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन


**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.13 )**- जिल्ह्यातील सन 2025 ते 2030 या कालावधीत सार्वत्रिक निवडणुकीद्वारे गठित होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठीचे आरक्षण येत्या 23 आणि 24 एप्रिल 2025 रोजी निश्चित केले जाणार आहे. यासाठी नागरिकांनी संबंधित तहसील कार्यालयात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व 14 तालुक्यांमध्ये तालुकास्तरावर प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदारांमार्फत ही सोडत प्रक्रिया पार पडणार आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग (नामाप्र) या पदांसाठी महिला आरक्षणासह सरपंचपदाचे आरक्षण निश्चित केले जाईल. दि. 23 एप्रिल रोजी अमरावती - तहसिलदार कार्यालय, अमरावती, भातकुली - तहसिलदार कार्यालय, भातकुली, चांदूर रेल्वे - तहसिलदार कार्यालय, चांदूर रेल्वे, दर्यापूर - तहसिलदार कार्यालय, दर्यापूर, अचलपूर - तहसिलदार कार्यालय, अचलपूर, धारणी - तहसिलदार कार्यालय, धारणी, मोर्शी - तहसिलदार कार्यालय, मोर्शी तसेच दि. 24 एप्रिल रोजी नांदगाव खंडेश्वर - तहसिलदार कार्यालय, नांदगाव खंडेश्वर, तिवसा - तहसिलदार कार्यालय, तिवसा, धामणगाव रेल्वे - तहसिलदार कार्यालय, धामणगाव रेल्वे, वरूड - तहसिलदार कार्यालय, वरुड, अंजनगाव सुर्जी - तहसिलदार कार्यालय, अंजनगाव सुर्जी, चांदूर बाजार - तहसिलदार कार्यालय, चांदूर बाजार, चिखलदरा - तहसिलदार कार्यालय, चिखलदरा येथे दुपारी 12 वाजता संबंधित तहसील कार्यालयाच्या सभागृहात ही सोडत प्रक्रिया पार पडेल. उपविभागीय अधिकारी हे नियंत्रण अधिकारी म्हणून या सोडतीसाठी उपस्थित राहतील.संबंधित नागरिक आणि ग्रामपंचायत सदस्यांना या सोडतीसाठी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.



## अनोळखी व्यक्तीचा मृत्यू, उष्माघाताची शक्यता

**अमरावती** - जिल्हा सामान्य रुग्णालयासमोरील पाणपोईजवळ एका 35 ते 40 वयोगटातील इसमाचा 11 एप्रिल रोजी मृतदेह आढळून आला. या इसमाची उष्माघाताने मृत्यु झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या घटनेच्या माहितीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयातील शवगारात ठेवला आहे. मृताची ओळख अद्याप पटली नसून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.



# आझाद हिंदसह अनेक एक्सप्रेस रद्द

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** - भर उन्हाळ्यात विदर्भवासीयांसाठी पुणे प्रवास खडतर बनला आहे.झारखंडमध्ये सुरू असलेल्या रेल्वे मार्गाच्या कामामुळे दुरांतो एक्सप्रेस, गीतांजली एक्सप्रेस आणि आझाद हिंद एक्सप्रेस अशा अनेक प्रमुख एक्सप्रेस सेवांसह एकूण 26 गाड्या 15 दिवसांसाठी रद्द करण्यात आल्या आहेत. बिलासपूर आणि झारसुगुडा दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या लाईनचे कनेक्शन सुलभ करण्यासाठी दक्षिण पूर्व रेल्वेने ब्लॉकची घोषणा केली आहे, ज्यामुळे 24 एप्रिल पर्यंत रेल्वे सेवांवर परिणाम होणार आहे. त्याचा फटका विदर्भातील प्रवाशांना बसला आहे.



उन्हाळी सुट्ट्यांचा हंगाम सुरू असून, रेल्वेला प्रवाशांची गर्दी वाढू लागली आहे; पण रेल्वेकडून बिलासपूर विभागातील चौथ्या मार्गावरील 'कनेक्टिव्हिटी'चे काम सुरू करण्यात आले आहे.23 एप्रिल पर्यंत हे काम चालणार आहे. त्याचा परिणाम काही रेल्वे गाड्यांवर झाला आहे. त्यामुळे या वेळांमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी प्रवाशांनी त्यांच्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, पुणे-हावडा आझाद हिंद एक्सप्रेस 10 ते 19 एप्रिल आणि पुन्हा 11 ते 24 एप्रिल दरम्यान रद्द करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे मुंबई-हावडा गीतांजली एक्सप्रेस 11 आणि 24 एप्रिल रोजी धावणार नाही. हावडा-पुणे दुरांतो एक्सप्रेस 10 ते 21 एप्रिल दरम्यान रद्द राहील. इतर प्रभावित गाड्यांमध्ये पोरबंदर-शालीमार एक्सप्रेस (9-19 एप्रिल) आणि मुंबई-शालीमार ज्ञानेश्वरी एक्सप्रेस (11-24 एप्रिल) यांचा समावेश आहे.विदर्भातून पुणे येथे ये-जा करण्यासाठी महाराष्ट्र एक्स्प्रेस आणि आझाद हिंद एक्स्प्रेस या दोनच गाड्या दररोज नियमित धावतात. इतर सर्व गाड्या वेगवेगळ्या दिवशी आहेत. त्यातही आझाद हिंद एक्स्प्रेस रद्द झाल्याने प्रवाशांची मोठी अडचण झाली आहे. 20822 संत्रागाछी -पुणे हमसफर एक्स्प्रेस नागपूरहून दर रविवारी धावते, पण 13 एप्रिल आणि 20 एप्रिल रोजी ही एक्स्प्रेस रद्द करण्यात आली आहे. तर 20822 पुणे-संत्रागाछी एक्स्प्रेस 14 एप्रिल आणि 21 एप्रिल रोजी रद्द करण्यात आली आहे.

याशिवाय हावडा-पुणे दुरांतो एक्स्प्रेस देखील 17 आणि 19 एप्रिल रोजी रद्द करण्यात आली आहे, तर पुणे-हावडा 19 आणि 21 एप्रिल रोजी धावणार नाही, त्यामुळे प्रवाशांना पर्यायी साधनांचा वापर करावा लागणार आहे. रेल्वेच्या वेळापत्रकात बदल झाल्यामुळे अनेक प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### महामानवाचा संदेश

समग्र विकास व्हावा देशाचा
हे उदिष्ट ठेवूनी मनी
देशाची घटना लीहीली हो
डॉ . बाबासाहेबांनी ... !

स्त्री व पुरुष असती
परस्पर पुरक जाती
रक्त सर्वांचे लालच असे
मग कां भेदाभेद निती ? ..

सर्वांना मिळेल समान संधी
धोरण असे स्विकारले
लोकशाहीला हेच अभिप्रेत
हे ते नाही विसरले ...

देश रहावा एकसंघ म्हणून
समता बंधूता तत्व स्विकारू
विविधतेत एकता टिकून राहो
ही दक्षता आपण घेऊ हृ

समतोल विकास धोरण हवे
नकोत हेवे दावे
असंतोषाची ठिणगी पडते
हे राज्यकर्त्यांनी ध्यानी घ्यावे

खांदाला खांदा लावूनी
करू आपण वाटचाल
तरच राहील भारताचा
हो उज्वल भविष्यकाळ ...

# विश्वाला लाभलेली सर्वोत्तम देणगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर



**भारताच्या पावन भूमीवर अनेक महापुरुषांनी जन्म घेतला. ते देशासाठी व समाजासाठी अहोरात्र झटले. त्यांनी सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासली. त्यांचा सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशा दर्शक ठरत आहे. अशा या थोर महापुरुषात विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सर्वात प्रथम उच्चारावे लागेल.**

---------------

डॉ. बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने त्यांनी दीन, दलितांच्या, श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलितगात्र झालेल्या मनामनांतून बहुजन समाजक्रांतीचे स्फुलींग चेतविले. त्यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले.

बाबासाहेब म्हणजे प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती होय. ते नुसते पुस्तकी पंडित नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी मानव मात्रांच्या जीवनातील दुःख, दारिद्रय आणि क्लेश दूर करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पूरे ज्ञान माहिती व बळ लावले. रंजल्या गांजल्या जनतेच्या तसेच स्त्रीवर्गाच्या, शेतकरी-मजूर वर्गाच्या आणि पददलितांच्या उद्धारार्थ आपले प्राण पणाला लावून समतेची मंगलवाट दाखवली. मानवतेची दिव्य ज्योत निर्माण करते ती व्यक्ती केवळ वंदनीयच नव्हे तर ती व्यक्ती प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती ठरते.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार तथा भारताच्या राष्ट्रीय ग्रंथ- संविधानाचे ग्रंथकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी दि. १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. बाल भीमावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून ते दांपत्य दक्ष असत. स्वतःसह भीमरावांना वाचनाची खुप आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच.

वडील रामजी हे मुलांनाही चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत. म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्यांच्या ठायी आढळते. जगद्गुरू संत तुकारामजी व संतशिरोमणी कबीर हे बाबासाहेबांच्या भावी आयुष्यात अभ्यासाचे विषय झालेले दिसतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनीती, अत्याचार, अन्याय यांना त्यांचा प्रखर विरोध होता. जातीभेदाच्या ते विरोधात होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड ते मानत असत. ही सामाजिक किड नष्ट केल्याशिवाय बहुजन समाज एकसंघ होणार नाही, असे ते समजत. डॉ. बाबासाहेब म्हणजे तळागळातील लोकांना बौद्धिक व समाजिक गुलामगिरीतून मुक्त करून त्यांना मंत्र देणारे एक पथदर्शक होते.



**एन. के. कुमार गुरूजी.**
**गडचिरोली.**
**७७७५०४१०८६**

शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय, अन्याय, आपले हक्क हे आपल्याला कळत नाही, अशा प्रकारे त्यांनी समाजात सामाजिक क्रांतीचे रणशिंगच फुंकले. स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी त्यांनी अनेक चळवळी केल्या.

स्त्रियांची गुलामगिरीही त्यांनी दूर केली. १९२७ ते १९५६ पर्यंतच्या काळात त्यांनी भारतीय स्त्रीचा सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय दर्जा वाढावा म्हणून सतत प्रयत्न केले. १९४२ साली भरलेल्या नागपूर येथील परिषदेत त्यांनी महिलांना सांगितले की, स्वच्छता पाळा. सर्व दुर्गुणांपासून दूर रहा. मुलामुलींना शिक्षण अवश्यच द्या. त्यांना महत्वाकांक्षी बनवा. त्यांचा न्यूनगंड दूर करा, अशा महत्वपूर्ण उपदेशांचे डोळ्यांत झणझणीत अंजन घातले.

दलितांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी त्यांनी त्यांच्या हक्कासाठी लढा दिला. श्रमजीवींसाठीही ते खंबीरपणे उभे राहिले. दलितांना मानाचे जीवन जगता यावे, म्हणून ते आजीवन सातत्याने संघर्ष करीत राहीले. केवळ दलितासाठीच नव्हे, तर शेतकरी, शेतमजूर, मजूर आणि कामगार आदींच्या प्रश्नासंबंधी जोरदार लढा दिला.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी, यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले.

"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो माणूस प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही," असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. "प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की, ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावेत.

शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे. त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे.

शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणाऱ्यांनी ध्यानी घ्यावे.

पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन १९४६ साली करून त्यांनी मुंबइला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलींद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहीत व समाजहीताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय, असे ते मानत. डॉ. बाबासाहेबांच्या आचार विचारांत राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा भरलेली होती.

डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच तत्कालीन राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली. त्यांना वाटले, डॉ. आंबेडकर आता देश सोडून जाणार की काय? परंतु या महामानवांनी निक्षून सांगितले, "आम्ही या भारत देशाची संतान आहोत. आम्हाला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहेच. राष्ट्रावर संकट आल्यास प्राण पणाला लावून देशाचे रक्षण केले व पुढेही करूच!" यात डॉ.आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा सामावलेली दिसून येते.

अशा या महामानवाचे महान कार्य म्हणजे देशासाठी व बहुजनवर्गाच्या समाजासाठीचे सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विश्वाला मिळालेली महानतम सर्वोत्तम देणगी होय.

अशा या महामानवाचे दि.६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले. त्यांनी आपल्या कार्याचा ठसा आमच्यासाठी मागे उमटवून ठेवला. नमो बुद्धाय, जय भीम! जयंतीनिमित्त विश्ववंद्य महामानवास विनम्र अभिवादन !!

■ ■ ■

# संवैधानिक अधिकारांवरच अतिक्रमण?

संवैधानिक उपायांचा अधिकार हा भारतीय संविधानाचा मूलभूत अधिकाराचा भाग आहे. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या अधिकारास संविधानाचे हृदय आणि आत्मा म्हटले आहे. तर संविधानाने बहाल केलेले नैसर्गिक न्यायाचे तत्व हे न्यायाच्या प्रक्रियेत निष्पक्षता आणि न्याय सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाचे आहे.

परंतु, याच तत्वाला तडा दिला जात आहे. त्यामुळेच कथित बेकायदेशीर बांधकामांविरुद्ध बुलडोझर कारवाई करणे हे न्यायाच्या नैसर्गिक नियमांचे उल्लंघन आहे, असे देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वीच म्हटले आहे, संवैधानिक अधिकारांवरच शासनकर्ता वर्गाकडून अतिक्रमण करण्यात येत असल्याने नागरिकांच्या मूलभूत हक्कांवरच गदा येत आहे. घटनाकारांना अपेक्षित सवैधानिक राष्ट्रात आता नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांस नाकारले जाते की काय? असा मूलभूत प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती निमित्ताने उपस्थित होत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाच्या कलम २१ चा निवारा मिळण्याचा अधिकार देखील अविभाज्य भाग आहे. परंतु, निवासी प्रयोजनासाठी गरिबांनी केलेली झोपडपट्ट्यातील अतिक्रमणे सरसकट पाडण्याचे धोरण विविध राज्य सरकारांकडून अवलंबिले जात असल्याने हजारो कुटुंबांवर बेघर होण्याची पाळी आलेली आहे. त्यातच पक्षपातीपणे बुलडोझर कारवाई केली जात असल्याने संवैधानिक हक्कांचेच उल्लंघन होत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने जबरदस्तीच्या अतिक्रमण हटाव कारवाईला असंवैधानिक घोषित करूनही, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात बुलडोझरचा अन्याय अलिकडेच दिसून आला. न्यायालयाने म्हटले आहे की, हा अन्याय म्हणजे केवळ झोपडपट्ट्या आणि घरे पाडणे नाही तर ते कायद्याच्या योग्य प्रक्रियेचे आणि कलम २१ चे उल्लंघन आहे. जे प्रत्येक नागरिकाच्या जीवनाचे आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याची हमी देते.

संविधानात सर्वोच्च न्यायालयासाठी कलम ३२ मध्ये आणि उच्च न्यायालयांसाठी कलम २२६ मध्ये समाविष्ट आहे. या अधिकारानुसार, जर एखाद्या व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले तर तो न्यायालयात दाद मागू शकतो. हा अधिकार महत्त्वाचा आहे कारण तो मूलभूत अधिकारांना प्रत्यक्षात आणतो आणि नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण मिळण्याची खात्री देतो.

उत्तर प्रदेशात बुलडोझर कारवाईबाबत यापूर्वीही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने बुलडोझर कारवाईबाबत सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे देखील जारी केली होती, परंतु नोकरशाही कोणत्याही निबंधाशिवाय काम करते.

सर्वोच्च न्यायालयाने प्रयागराज विकास प्राधिकरणाला बुलडोझर कारवाईबद्दल फटकारले आहे आणि त्यांची कृती असंवैधानिक असल्याचे म्हटले आहे. न्यायालयाने ६ जणांची घरे पाडणे बेकायदेशीर आणि अमानवी असल्याचे म्हटले आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रशासनाचा हेतू अनधिकृत बांधकामांना परावृत्त करण्याऐवजी त्यांना धडा शिकवण्याचा आहे. खरं तर, उत्तर प्रदेशातील सरकार आणि प्रशासन तथाकथित 'त्वरित न्याय' च्या बुलडोझर मॉडेलची अंमलबजावणी करण्यात आघाडीवर आहे.

या वादग्रस्त कृतीचा बचाव करताना, राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी म्हटले होते की, कधीकधी काही लोकांना त्यांना समजणाऱ्या 'भाषेत' गोष्टी स्पष्ट कराव्या लागतात. याचा अर्थ असा की, अशा घटकांना न्यायालयाकडून दोषी किंवा निर्दोष घोषित होण्याची वाट न पाहता शिक्षा दिली जाईल.

हे उल्लेखनीय आहे की गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये सर्वोच्च न्यायालयाने बुलडोझरचा सतत वापर थांबवण्यासाठी अनेक मार्गदर्शक तत्त्वे दिली होती. यामध्ये घर पाडण्याच्या पंधरा दिवस आधी रहिवाशांना सतर्क करणे इत्यादींचा समावेश होता. न्यायालयाने असा इशाराही दिला की, निर्देशांचे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध अवमानना कारवाई सुरू केली जाईल. त्याच्यावर गुन्हा दाखल केला जाईल. पण असे असूनही, जमिनीवरील वास्तवात कोणताही बदल झाला नाही.

बेकायदेशीर बांधकामे हटवली पाहिजेत, परंतु सर्व नियम आणि कायदे पाळणे देखील तितकेच महत्वाचे आहे. बुलडोझरचा घाईघाईने वापर असंवैधानिक आहे आणि नागरी हक्कांचे उल्लंघन आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. ज्याला कायदा परवानगी देत नाही.



**अनिल वासनिक**
**ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ता**
**नागपूर.**
**9823286373**

प्रयागराज आणि महाराष्ट्रातील काही ठिकाणी लोकांनी आरोप केला की नोटीस दिल्यानंतर चोवीस तासांच्या आत त्यांची घरे पाडण्यात आली. लोकांना अपील करण्याची संधीही देण्यात आली नव्हती, असे सांगण्यात आले. तथापि, एखाद्या कथित गुन्हेगाराच्या संपूर्ण कुटुंबाला त्याच्या कृत्याबद्दल शिक्षा होणे हे नैसर्गिक न्यायाचे उल्लंघन आहे.

वास्तव असे आहे की, कोणतेही बेकायदेशीर बांधकाम एका रात्रीत उभे राहत नाही. जेव्हा ते बांधले जात आहे तेव्हा स्थानिक प्रशासनाला ते का लक्षात येत नाही? अचानक अशी परिस्थिती का निर्माण होते की ती तातडीने पाडण्याची गरज भासते? मग बुलडोझर लगेच काम करायला लागतो.

दुसरा प्रश्न असा आहे की लहान-मोठे लोक, श्रीमंत वर्ग आणि प्रभावशाली नेते यांनी केलेल्या बेकायदेशीर बांधकामांवर तात्काळ कारवाई होते का? निःसंशयपणे, बुलडोझरचा वेग केवळ सत्ताधारी वर्गाच्या संरक्षणाखालीच वाढतो.

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने घरे पाडण्याच्या पद्धतीवरही आक्षेप व्यक्त केला आणि म्हटले की, प्रशासनाने, विशेषतः विकास प्राधिकरणाने, हे लक्षात ठेवावे की निवारा मिळण्याचा अधिकार देखील संविधानाच्या कलम २१ चा अविभाज्य भाग आहे. बेकायदेशीरपणे पाडण्याची प्रक्रिया संविधानाच्या कलम २१ अंतर्गत याचिकाकर्त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन आहे.

प्रयागराजमध्ये बुलडोझर कारवाईदरम्यान एका मुलीच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओची सर्वोच्च न्यायालयानेही दखल घेतली. या व्हिडिओने न्यायाधीशांच्या विवेकाला धक्का दिला. व्हायरल व्हिडिओमध्ये, जेव्हा प्राधिकरणाचे अधिकारी घरे पाडण्यासाठी आले तेव्हा एक मुलगी तिच्या जीवाची पर्वा न करता घरात ठेवलेली पुस्तके परत आणण्यासाठी धावताना दिसत आहे.

हे दृश्य प्रत्येकाला हादरवून टाकते. यावर सर्वोच्च न्यायालयाने अधिकाऱ्यांची कृती पूर्णपणे असंवेदनशील असल्याचे म्हटले. न्यायालयाने आपल्या निर्णयात स्पष्टपणे लिहिले आहे की घर पाडण्यापूर्वी १५ दिवसांची नोटीस देणे बंधनकारक आहे. विडंबन म्हणजे गेल्या काही वर्षांत उत्तर प्रदेशच्या योगी सरकारने बुलडोझर कारवाईला कायदा आणि सुव्यवस्थेचे समानार्थी शब्द म्हणून सादर केले आहे. यामुळे केवळ सरकारवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले नाही तर देशात अल्पसंख्याक समुदायाला लक्ष्य केले जात असल्याचा संदेशही गेला.

अशा परिस्थितीत, कायदेशीर कृती देखील संशयाच्या भोवऱ्यात आल्या. उत्तर प्रदेश सरकारने गुंड, माफिया आणि गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई केली ज्याचे कौतुक करायला हवे. पण एका व्यक्तीच्या गुन्हेगारी कृत्यासाठी संपूर्ण कुटुंबाला शिक्षा देणे हे न्यायाच्या विरुद्ध आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये, देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने टिप्पणी केली होती की, आपण एक धर्मनिरपेक्ष देश आहोत आणि येथील गुन्हेगारी कायदे धर्माने प्रेरित असू शकत नाहीत.

न्यायालयाने स्पष्टपणे सूचित केले होते की जर प्रशासनाने बेकायदेशीरपणे घर पाडले तर त्यांना ती मालमत्ता पीडितांना परत करावी लागेल. अशा प्रकरणांमध्ये जबाबदारी निश्चित करण्यासाठी एक ठोस व्यवस्था असली पाहिजे. जेव्हा एखाद्याचे घर पाडले जाते तेव्हा त्याचे केवळ आर्थिक नुकसान होत नाही तर सामाजिक नुकसानही होते. सर्वोच्च न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे बेपर्वा बुलडोझर कारवाईला आळा बसेल आणि नोकरशाही कोणतेही पाऊल उचलण्यापूर्वी विहित प्रक्रियेचे पालन करेल, अशी आशा आहे. बुलडोझर कारवाई करून आपला राजकीय प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करणाऱ्या इतर राज्यांनाही नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करावे लागेल, अशी अपेक्षा बाळगणे ही चूक ठरू नये.

■ ■ ■

# तू तोडल्या गुलामगिरीच्या बेडया..

महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची भीमजयंती आनंदात सर्वत्र साजरी करण्यात येतं आहे.त्यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी एका गरीब कुटुंबात झाला. त्यांनी त्यांना अवगत असलेल्या ज्ञानाचे बळावर आयुष्यभर अपार कष्ट करून ज्ञानसाधना करून अनेक विषयात प्रभुत्व संपादन केले. याद्वारे त्यांनी स्वतःची शैक्षणिक उन्नती तर साधलीच, पण, विशेषतः सर्वसामान्य नागरिक, नोकरीपेशा महिला, व विविध घटकांतील अन्यायग्रस्त समाजासाठी त्यांनी मोलाचे अतुलनीय कार्य केले. त्यांना न्याय हक्काचा रस्ता दाखविला अशा लोकांसाठी त्यांनी चेतना, जागृती निर्माण करण्यासाठी विपुल लिखाण केले. ज्यामधून आपल्यावर कोणीतरी अन्याय करत आहे, ज्यांचेमूळे आपला सामाजिक विकास थांबला आहे, अडचण निर्माण होते आहे याची जाणीव आम्हाला जेवढ्या लवकर होईल तितके ते आमचे हिताचे ठरेल असेही तत्कालीन त्यांनी मोठ मोठया सभेत भाषणंवेळी किंवा सभेत संबोधित करतांना अनेक वेळा सांगून ठेवले आहे.





जातीपातीचा विचार न करता सर्वांसाठी मानव कल्याणासाठी त्यांनी कार्य केले. स्त्रियांच्या सन्मानासाठी केलेल्या कार्यात बाबासाहेबांचा सिंहाचा वाटा आहे. प्रत्येकाने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा विरोध करायलाच पाहिजे. वाचाल तर वाचाल, असा संदेश बाबासाहेबांनी दिल्यामुळे आज अन्यायग्रत्तांना गुलामगिरीच्या बेड्या तोडून ताठ मानेने जगायला भारतरत्न बाबासाहेबांनी शिकविले.

अन्यायग्रस्ताच्या वाट्याला आलेले दुःखे बाबासाहेबांनी स्वतः अनुभवली होती त्यामुळेच ते आपल्या बांधवांना आत्मविकासाचा योग्य मार्ग दाखवू शकले.

जुन्याकाळी समाज अज्ञान, निरक्षरतः अनिष्ट रूढी परंपरा,अंद्रश्रद्धा, गरिबी अशा व्याधींनी समाज पोखरलेला होता, दुःखी होता. अन्याय, छळ, अपमान ,अशा जगण्याने समाजाचे रोजचे जीवन दुःखमय झाले होते. अशा समाज बांधवांची दुःखे भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेबांनी पाहिले आणि स्वतःही ती दैनदीन जीवनात त्यांनी अनुभवली होती. अश्या माझ्या बांधवांचें दुःख मी दूर करीन या हेतूने अनेक कार्य त्यांनी त्यावेळी केले मानवतेच्या. नागरिकांचा अधिकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेबांनी अपार कष्ट करून मिळवून दिला.

समाजउन्नतीसाठी त्यांच्या मध्ये चेतना, ऊर्जा निर्माण व्हावी या साठी अनेक महान ग्रंथ भारतरत्न बाबासाहेबांनी लिहून समाजासाठी उपलब्ध करून दिले. स्वतंत्र भारता साठी राज्यघटना लिहून भारतात लोकशाही राज्यव्यवस्थेचा मजबूत पाया घातला म्हणून आज भारत हे जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र ठरले.

बाबासाहेबांनी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत स्वतंत्यांचे रक्षणासाठी नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी कार्य केले, ज्या कार्यामुळे भारत प्रसेंशेस, सन्मानास पात्र ठरला, ज्या मुळे जगात आपल्या भारतदेशांची एक वेगळी ओळख निर्माण झाली. भारतरत्न बाबासाहेब आंबेडकरासंबंधी कितीही लिहिले तरी कमीच पडेल.

*तु फुकलेस रणशिंग*
*अगाध ज्ञानाच्या बळावर*
*तु तोडल्या गुलामगिरीच्या बेडया*
*त्या ज्ञानाच्या बळावर...*

जयंती निमित्ताने महामानवाला विनम्र अभिवादन.



**उमेश महादेवराव ढोणे**
**महासचिव**
**अन्याय्यग्रस्त कृती समिती**
**९०४९०६७३३१**

■ ■ ■

# डॉ. आंबेडकरांची ग्रंथसंपदा

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, राजकारण या विषयावर अनेक ग्रंथ लिहिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथरूप लेखन इंग्रजी भाषेतीलच आहे.

त्यांनी एम. ए. पदवीकरिता लिहिलेल्या प्रबंधाचा विषय 'प्राचीन भारतातील व्यापार' असा होता. 'भारताच्या राष्ट्रीय 'नफ्याचा वाटा : एक ऐतिहासिक पृथकरनात्मक अध्ययन' या विषयावर त्यांचा प्रबंध पुढे इव्होल्युशन ऑफ प्रॉव्हिनशिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया या नावाने प्रकाशित झाला ( 1924). प्रस्तुत प्रबंधात त्यांनी ब्रिटिश सरकारच्या आर्थिक धोरण ब्रिटनमधील उद्योगधंद्याच्या हिताच्या दृष्टीने आखले जाते, हे सिद्ध केले.

**सौ. चैताली संगोपाल वरघट**
**मूर्तिजापूर, जि. अकोला.**
**9834583685**

कोणताही देश झाला तरी त्यात एखाद्या वर्गावर अन्याय होणे या विषयक सखोल लिखित माहिती तसेच त्यांचे या देशात राजकीय अधिकार नाकारता येत नाही. याकरता तर तर्कशुद्ध मीमासा प्रस्तुत ग्रंथात आढळतो. आंबेडकरांच्या अर्थशास्त्राविषयी दुसरा प्रबंध म्हणजे 'द प्रॉब्लेम ऑफ रुबी' हा होय. रुपयाचे पौंडाशी प्रमाण बसवून इंग्रजी राज्यकर्त्यांनी केवळ इंग्रजी व्यापाराचेच हीच साधून भारताचे कसे नुकसान केले यावर त्यांनी प्रस्तुत प्रबंध प्रकाश टाकला आहे.

'धर्म आणि जातीसंस्था' यासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार क्रांतिकारक होते. 1936 साली लाहोर येथील 'जातपात तोडक' मंडळाच्या वार्षिक संमेलनातील अध्यक्षीय भाषण 'ऑनायहिलेशन ऑफ कास्ट' या पुस्तकात त्यांनी प्रसिद्ध केले.

जातिव्यवस्था ही श्रमिकांच्या अनैसर्गिक विभागणीस व हिंदू समाजाच्या ऐतिहासिक पराभवास, नैतिक अधोगतीस तसेच त्यांच्या दुबळेपणास कारणीभूत आहे. जाती व्यवस्था मुख्य आधार म्हणजे हिंदूंचा धर्मभोळेपणा असून तो नष्ट करून स्वातंत्र्य, समता व बंधुता यांच्या तात्विक अधिष्ठानावर हिंदू समाजाचे पुनर्घटना करावी अशी प्रेरक विचारसरणी आंबेडकरांनी या पुस्तकात मांडली आहे.

'व्हॉट कॉंग्रेस अँड गांधी हॅव डन टू द अनटचिबल्स (1945)'. या ग्रंथात त्यांनी कॉंग्रेसच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्यक्रमाच्या मयार्दा आणि अपयश याची चर्चा केली आहे.

आंबेडकरांच्या व्यासंगाचे व संशोधनकुशलतेचे प्रतीक असलेला ग्रंथ म्हणजे ' हू वेअर दि शुद्धाज '(1946) हा होय.

'द अनटचेबल्स ' या नावाने त्यांचे पुस्तकही या संदर्भात उल्लेखनीय आहे. 'बुद्ध अँड हीज धम्म ' हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ त्यांच्या मरणोत्तर प्रसिद्ध झाला. धमार्चा रूढ कल्पनाहून बौद्ध धर्माची कल्पना वेगळी असून ती समाजाच्या पुनर्रचनीशी अधिक निगडित आहे. त्यामुळे सामाजिक व नैतिक मूल्य हेच बौद्ध धर्माचे खरे अधिष्ठान आहे.

लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्य प्रमाणे आंबेडकरांनी बौद्ध धर्माचे कालोचित रहस्य या भाष्य ग्रंथात विशद केले आहे. आंबेडकरांच्या राजकीय विषयावरील ग्रंथापैकी 'थॉट्स ऑन पाकिस्तान ' या पुस्तकात पाकिस्तान झाल्यावर हिंदूच्या उत्कर्षाचा मार्ग मोकळा होईल असा युक्तिवाद केला होता.

याशिवाय 'रानडे, गांधी अँड जिना'(1943)', ' थॉट्स ऑन लिग्विस्टिक स्टेट्स', (1955)' यासारखी त्यांची पुस्तकेही विचार प्रेरक आहेत.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची ग्रंथसंपदा पुढील प्रमाणे, प्राचीन भारताचा व्यापार (1915).भारतीय जातीसंस्था, तिची यंत्रणा, उत्पत्ती व विकास (1916). भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटाः एक ऐतिहासिक पृथकरणात्मक परिशिलन(1916). ब्रिटिश भारतातील प्रतीक व अर्थशास्त्रीय उत्क्रांती(1924). भारतातील जाती( कास्टस इन इंडिया 1924 ). पाकिस्तानविषयी विचार (थॉट्स ऑन पाकिस्तान 1940). कॉंग्रेस व गांधी यांनी अस्पृश्य वर्गात कसे वागविले? (1945). शूद्र पूर्वी कोण होते? ( हू वेअर द शुद्धाज 1946). बुद्ध व त्यांचा धम्म (1957). गांधी व अस्पृश्यजनांचे बंधविमोचन. ऑनिहेलेशन ऑफ कास्ट (1943). रानडे, गांधी अँड जिना (1943). द अनटचेबल्स (1948). थॉट्स ऑन लिंग्विस्टिक स्टेटस (1955). रिडल्स इन हिंदूइझम (1957 ). डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मराठी लेखन अल्प असून ते मुख्यता त्यांनी काढलेल्या विविध वृत्तपत्रातून विखुरलेले आहे.

■ ■ ■

# उन्हाळ्यात आहारात करा या भाज्यांचा समावेश

उन्हाळा सुरू झाला आहे आणि पुढील काही आठवड्यात तापमान झपाट्याने वाढू शकते. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, दिल्ली-एनसीआरमध्ये पारा वाढण्याची शक्यता आहे.

तापमान वाढल्याने शरीराला निरोगी राहणे कठीण होईल. उन्हाळ्यात शरीराला थंडावा आणि ताजेपणाची आवश्यकता असते. या ऋतूत भाज्यांचे सेवन केल्याने शरीराला आवश्यक पोषक तत्वे मिळतात. उन्हाळ्यात ताजेपणा टिकवून ठेवण्यासाठी, पाण्याची कमतरता पूर्ण करण्यासाठी आणि पचनसंस्था निरोगी ठेवण्यासाठी काही भाज्या खूप फायदेशीर असतात. या भाज्यांचे सेवन करून तुम्ही तंदुरुस्त आणि निरोगी राहू शकता.

उन्हाळ्यात निरोगी राहण्यासाठी लोकांनी पाण्याने समृद्ध भाज्या खाव्यात आणि स्वतःला हायड्रेटेड ठेवावे. उन्हाळ्यात पोटाच्या समस्या वाढतात आणि त्या टाळण्यासाठी प्रत्येकाने फळे आणि भाज्यांनी समृद्ध आहार घ्यावा. तसेच, तळलेले आणि तेलकट पदार्थ टाळावेत.



उन्हाळ्यात लोकांनी दररोज 2 ते 3 लिटर पाणी नक्कीच प्यावे. जास्त वेळ उन्हात काम करणे टाळावे आणि कोणतीही समस्या असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

काकडी ही उन्हाळ्यातील सर्वात लोकप्रिय आणि ताजेतवाने भाजी आहे. त्यात 95% पाणी असते, जे शरीराला हायड्रेट ठेवते आणि तहान शांत करते. काकडी पचनसंस्था निरोगी ठेवते आणि त्वचेसाठी देखील फायदेशीर असते. हे शरीरातील अतिरिक्त उष्णता काढून टाकण्यास मदत करते.

टोमॅटोमध्ये भरपूर पाणी, व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे उन्हाळ्यात शरीराला थंडावा देण्यासाठी उपयुक्त असतात. टोमॅटोचे सेवन केवळ त्वचेसाठीच चांगले नाही तर ते पचन सुधारते आणि शरीरातील जळजळ कमी करते. उन्हाळ्यात टोमॅटोचा रस पिल्यानेही ताजेपणा येतो.

दुधी ही उन्हाळ्यातील सर्वात हलकी आणि पौष्टिक भाजी मानली जाते. हे शरीराला थंडावा देते आणि पचनसंस्था मजबूत करते. भोपळ्याचे सेवन केल्याने रक्त शुद्ध होते आणि शरीरातील पाण्याची कमतरता देखील भरून निघते. भोपळ्याचा रस पिल्याने शरीर ताजेतवाने राहते.

भोपळ्यामध्ये व्हिटॅमिन ए, सी आणि फायबरसारखे भरपूर पोषक घटक असतात. हे शरीराला थंडावा देते आणि पचनसंस्था निरोगी ठेवते. विशेषतः भोपळ्याचे सेवन केल्याने पोटाच्या समस्या कमी होण्यास मदत होते आणि उन्हाळ्यात शरीराला ताजेतवाने वाटते.

शिमला मिरचीमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे शरीराला हायड्रेट ठेवतात आणि उन्हाळ्यात ताजेपणा देतात. हे चयापचय गतिमान करते आणि शरीराला थंड करते. शिमला मिरचीचे सेवन केल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास देखील मदत होते.

■ ■ ■

# भिमाचे विचार समाजात पेरू...

*करावे गुलामास जागे धरुनी दंड*
*उठेल करावया तोच भारती बंड*
*भिमाने हेच केले गाजविले नऊ खंड*
*प्रचंड भुवरती पेटवीले रणकुंड*
*चारी वर्णाचे जाळूनी तोंड*
*उभ्या विश्वात काढली त्यांची पुरी धिंड*
*कराया सुखी सारा आपला भारत खंड*



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जगभरात मोठ्या थाटामाटात व आनंदात साजरी होती. विशेष म्हणजे एखाद्या महापुरुषांची जयंती जनसामान्य मानसांकडून मोठ्या थाटामाटात आदरात साजरी होणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील एकमेव महापुरुष आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर एकच नव्हे अनेक जागतिक नोंदी आहेत ज्या बघून प्रत्येक मानसाची मान सन्मानाने उंचावेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य व विचार यावर अनेक संशोधकांनी संशोधन केले आहे. एवढे महान कार्य व विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला दिले आहेत. आणि हे महान कार्य व विचार एका भाषणात किंवा एका पुस्तकात बंदिस्त होऊच शकत नाही.

तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वैचारिक मानवंदना देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल समाजात जागृती निर्माण होण्यासाठी हा लेख लिहण्याचा प्रयत्न करत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समजून घेताना आपल्याला डोक्यातून जात बाहेर काढावी लागेल तेव्हाच आपल्याला खरे बाबासाहेब समजतील. जागतिक किर्तीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर समजण्यासाठी आपल्याला आपली बुद्धीमत्ता सुद्धां जाती धर्मापलिकडे जाऊन माणूस म्हणून माणसला बघण्याची असायला पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महार जातीत जन्माला आले म्हणून ते फक्त महारांचे उद्धारक आहेत असे मुळीच नाही. खरं तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समस्त मानसाचे उद्धारक आहेत. भारताचा इतिहास बघितला तर विषमतेने, अंधविश्वास, पाखंड, थोतांड च्या नावाखाली एकाच वर्गाच्या वर्चस्वाचे मानसाला गुलाम बनवणाऱ्या विकृत विचार व संस्काराने माखलेला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणत्याही एका वर्गाची व विशेषतः जे स्वतःला श्रेष्ठ व बुद्धिमान समजतात त्या वर्गाने इतरांना अज्ञान, ठेवून त्यांच्या मध्ये अंधविश्वास, थोतांड पसरवून लोकांच्या अज्ञानावर स्वतः ची झोळी भरून घ्यायची व माणसाच्या विकासचे सर्व द्वार बंद करून टाकायचे अशी कुटील व्यवस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उद्धवस्त करून लावली.

या व्यवस्थेचे गुलाम कोण होते? या व्यवस्थेने कोणाचे शोषण केले? धुर्त लोकांनी कोणाला लुबाडले? यांनी कोणा कोणाचे हक्क अधिकार नाकारले? कोण कोणापेक्षा श्रेष्ठ होते? याचे एकाच शब्दांत असे उत्तर आहे ते म्हणजे जात. आज जेवढ्याही जाती आहेत त्या सर्वच जाती गुलाम होत्या, हक्क अधिकार नव्हते, विकासासाचे सर्व दारे जाती साठी बंद होते. आणि यातीमधील कोणत्याही व्यक्तीला लिहण्याचा, बोलण्याचा, जागृती करण्याचा अधिकार नव्हता.

उदाहरण म्हणून बघायचे झाले तर संत तुकाराम महाराज यांच्या गाथा पाण्यात का बुडवाव्या लागल्या? आणि कोणी बुडवल्या हे जर आपण सत्य समजून घेतले तर आपल्या लक्षात येईल येथे तुकाराम महाराज यांना सुद्धां त्रास झाला. तुकाराम महाराज जातीने कुणबी-मराठा, दुसरे उदाहरण म्हणजे महात्मा फुले यांना वरातीतुन बाहेर कोणी आणि का काढले?



विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर
९१३०९७९३००

याचे उत्तर शोधायला गेले तर ज्यांनी तुकारामांच्या गाथा बुडवल्या त्यांच लोकांनी महात्मा फुले यांना वरातीतुन बाहेर काढले. महात्मा फुले माळी समाजाचे. राजश्री शाहु महाराजांचे वेदोक्त प्रकरण आपल्याला माहीतच आहे. राजर्षी शाहू महाराजांना त्रास देणारे विकृती कोण? शाहु महाराज मराठा समाजाचे.

हा सांगण्याचा उद्देश फक्त हाच आहे कि आपण जातीचा गर्व करणे निव्वळ मुर्खपणाचे आहे कारण जात निर्माण करून आपल्यावर गुलामीच लादण्यात आली, जातीच्या नावाखाली माणसाला माणसाने तुच्छ लेखुन एकमेकांचा द्वेष करायला लावला.

शेवटी सर्व जाती ह्या गुलामच. या सर्व गुलामांना स्वाभिमान, या सर्व मुक्यांचा वाचा फोडणारे मुकनायक, या सर्वांना शिक्षण, नोकरी, समान हक्क अधिकार, मान सन्मान, अस्तित्व निर्माण करून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत म्हणून तेच खऱ्या अर्थाने मानसाचे उद्धारक आहेत. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती फक्त एकाच जातीने नव्हे तर प्रत्येक भारतीयांनी अति आनंदाने साजरी करणे आवश्यक आहे.

कारण बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांचा समान उद्धार केला आहे. म्हणून बाबासाहेब समाजात पेरण्यासाठी आणि देशाचे हित साध्य करण्यासाठी बाबासाहेब आंबेडकर यांच्या जातीच्या लोकांची गरज नाही तर भिमाच्या मताचे लोक पाहिजे म्हणून वामनदादा म्हणतात...

*भीमा तुझ्या मताचे*
*जर पाच लोक असते*
*तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते*
*वाणीत भीम आहे करणीत भीम असता*
*वर्तन तुझ्या पिलांचे सारेच चोख असते*

आज आपल्या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेण्याची फँशन झाली आहे. उठसुठ कोणत्याही कार्यक्रमात बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले जाते, मोठमोठ्या बँनरवर बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो लागतो, राजकीय नेते बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतल्या शिवाय भाषण बंद करत नाही.

थोडक्यात काय वाणीत भिम आला परंतु करणीतुन भिम गायब झाला. दररोज जयभीम बोलणारे लोक बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराच्या विरोधात वागतात, बँनर लावणारे भाषण देणारे नेते बाबासाहेब आंबेडकरांचे नाव तर घेतात परंतु काम मात्र विचारधारेच्या विरोधात करतात, सर्वसामान्य मानसाला फसवणारा, भुलथापा मारून वेळ काढून घेणारा खऱ्या अर्थाने भिमविरोधी आहे.

बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने चालणारा व्यक्ती शिक्षण, नोकरी, समता, बंधुता, सामाजिक न्याय या बाबींवर काम करतो. परंतु हल्ली हे कोणीही करताना दिसत नाही. याचे कारण महार लोक डॉ. बाबासाहेब यांना मानतात ते जातीचे आहेत म्हणून, आणि इतर लोक स्विकारत नाहीत कारण ते जातीचे नाहीत म्हणून आणि हेच सर्वात घातक आहे.

थोडक्यात बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य कोणाकोणासाठी आहे याची जाणीव करून घेऊ जे विद्यार्थी शिक्षण घेतात, जे नोकरी करतात, जे पगार घेतात, ज्या महिला शिक्षण घेतात, शिक्षण घेताना मोफत शालेय साहित्य, नोकरी करताना पुरुषां प्रमाने पगार, प्रसुती पगारी रजा, बोनस, पेन्शन, जे शेतकरी वेगवेगळे शेतीसंदर्भात अनुदान घेतात, जे कामगार आठ तास काम व जास्त वेळ काम झाल्यास वाढीव पगार घेतात, या सर्वांवर बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकार आहेत.

ज्या महिला दुसरे लग्न करू शकतात, पती व वडीलांकडील संपतीत वाटा मागु शकतात, मुल दत्तक घेऊ शकतात, आणि मनात येईल तिथे फिरू शकतात, मनात येईल तसे कपडे घालु शकतात हे बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच. एवढेच नाही तर मोठ्या थाटामाटात मतदेण्यासाठी जातो तो मताधिकार सुद्धां बाबासाहेब आंबेडकर यांचाच आहे.

निवडणुकीत उभे राहतो ते सुद्धां डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच. हे सर्व करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणाची जात बघितली नाही. परंतु देशात शोकांतिका आहे की बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करताना बहुसंख्य जातीचे लोकच साजरी करतात. जाती मुळे नाही पण बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपकाराची जाणीव ठेवून बाबासाहेब समजून घेणे गरजेचे आहेत.

जाती धर्माचा गर्व करून पोटभरू नेत्यांच्या मागे लागून स्वतःला दंगलीत गुन्हेगार करून घेतल्या पेक्षा मी प्रथम भारतीय व अंतिमतः भारतीय म्हणणा?या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने गेलात तर देशाचे भले होईल. अडाणी आणि गुन्हेगार नेत्याचे ऐकून हातात दगड घेतल्या पेक्षा जागतिक ज्ञानाचे प्रतिक असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने जाऊन देशाची शासनकर्ता जमात झाला येणाऱ्या पिढ्या सुखी होतील.

चला बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, त्यांचे शिक्षण यामुळे आमचा उद्धार झालाच. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अजून एक संस्कार म्हणजे नैतिकता, आपले चारित्र्य. बाबासाहेब चारित्र्यवान होते म्हणून तरी आम्हाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना मानावेच लागेल.

सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे ज्या कायद्याने आमचा देश चालतो, प्रत्येकाला मान सन्मान मिळतो आणि आमच्या हक्क अधिकाराचे संरक्षण करणारे जगातील सर्वोत्कृष्ट संविधान लिहणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने देशाचे सुपुत्र आहेत. एक भारतीय म्हणून, देशाचा इमानदार नागरिक म्हणून आम्हाला बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्विकारून जयंती दिनी आनंद झालाच पाहिजे.

एवढे असुनही जर आम्ही बाबासाहेब आंबेडकर यांना एका जातीचेच उद्धारक मानु, बाबासाहेबांच्या जयंती दिनी मनात मनोमन आनंद होत नसेल तर आपण देशद्रोही आहोत. कारण देशाचे संविधान लिहणाऱ्या घटनाकाराला विरोध म्हणजे घटनेला विरोध आणि घटनेला विरोध हा देशद्रोह असतो.

जाती धर्म सोडून भिमाचे कर्म बघा डोळ्यातून पाणी येईल. एक रुपया आपण कोणाला फुकट देत नाही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः ची पुर्ण कमाई देशाच्या हितासाठी खर्च केली. घरात मुलाला किंवा बायकोला थोड जरी बरं नसले तर सर्व कामधंदे सोडून बायको मुलांकडे बघतारे आम्ही. याच बाबासाहेब आंबेडकर यांनी चार मुलं आणि बायको समाजाच्या हितासाठी मातीत घातले.

एवढा भिमाचा त्याग येथे समता, बंधुता सामाजिक न्याय व हक्क अधिकारासाठी होता. त्याग करूनही बाबासाहेब आंबेडकर यांना जातीत बंद करत असाल तर आपल्या एवढे बेईमान कोणीच नसेल.

भिम माझा कसा होता हे सांगाताना वामनदादा यांच्या ओळी आठवतात...

*काय सांगू तुला आता*
*भीम माझा कसा होता*
*लेकराला जशी माता,*
*भीम माझा तसा होता !*
*कायद्याच्या स्वरूपाने*
*त्याच माझ्या दयाळाने*
*दान केला ह्या देशाला,*
*ज्ञान साठा असा होता !*

वामनदादा यांनी सांगितल्या प्रमाणे भिम माझा सर्वकाही होता. म्हणून वामनदादा पुन्हा म्हणतात.

*उद्धरली कोटी कुळे*
*भीमा तुझ्या जन्मामुळे*
*उद्धरली कोटी कुळे ।*
*भीमा तुज्या जन्मामुळे*
*एक ज्ञान ज्योतीने कोटी कोटी ज्योती*
*तळपतात तेजाने तुझ्या धरती वरती*
*अंधार दूर तो पळे*
*भीमा तुझ्या जन्मामुळे*

आमचा उद्धार बाबासाहेब आंबेडकर यांनी केला म्हणून आम्हाला बाबासाहेब आंबेडकर यांना समाजात पेरावे लागतील. फक्त नाचून बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी होणार नाही तर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची मानसे तयार झाली तर तीच जयंती जल्लोषात साजरी होईल. म्हणून चला भिमजयंती साजरी करू, भिमाचे विचार समाजात पेरू.

भिमजयंतीच्या मंगलमय सदिच्छा..

■ ■ ■

## बाबासाहेबांचे जलविषयक धोरण

विश्वरत्न महामानव, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३४ वी जयंती. १४ एप्रिल १८९१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मध्यप्रदेशातील महू या गावी जन्म झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना १३४ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दीन दलीत, उपेक्षित, वंचित वगार्साठी, महिलांच्या कल्याणासाठी घालवले. या वगार्साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे कार्य केले ते सर्वांनाच माहीत आहे मात्र डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचे कार्य हे इतपतच मर्यादित नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदा, मानववंश शास्त्र, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र अशा अनेक क्षेत्रात बहुमोल कामगिरी बजावली. मात्र डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी देशाच्या अर्थशास्त्रात आणि जल धोरणात महत्वाची भूमिका बजावली हे खूप कमी लोकांना माहीत आहे.

आज महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. दर दोन वर्षांनी राज्यावर दुष्काळाची गडद छाया पसरते या वर्षीही राज्यावर किंबुहूना देशावर दुष्काळाचे सावट आहे अशावेळी बाबासाहेबांच्या जलधोरणाची आणि त्याच्या अमंबजावणीची किती गरज आहे याची प्रकर्षाने जाणीव होते.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

देशाची जलनीती, दामोदर खोरे प्रकल्प, हिराकुड धरण, सोननदी प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. आपल्या देशात जो पाऊस पडतो तो ठराविक कालावधीत म्हणजेच मोसमात पडतो. जून ते सप्टेंबर हा आपल्याकडे पावसाचा मोसम समजला जातो कारण याच चार महिन्यात आपल्याकडे पाऊस पडतो म्हणून त्याला मोसमी पाऊस म्हणतात.

या चार महिने पडणाऱ्या पावसावरच आपली शेती अवलंबून आहे. आपला देश कृषीप्रधान देश आहे जर या चार महिन्यात पुरेसा पाऊस झाला नाही तर त्याचा परिणाम आपल्या शेतीवर पयार्याने देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. दुसरी बाब म्हणजे आपल्या देशात सर्वत्र सारखाच पाऊस पडतो असे नाही काही भागात धो धो पाऊस कोसळतो तर काही भागात पाऊसच पडत नाही.

पावसाच्या विषम प्रमाणामुळे देशात एकाच वेळी काही भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य तर काही भागात अती पाऊस झाल्याने पूर जन्य परिस्थिती असे चित्र दिसते. पावसाच्या या लहरिपणाचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. निसर्गावर आपले नियंत्रण नाही मात्र पाण्याचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करून या संकटावर मात करता येऊ शकते हे बाबासाहेबांनी जाणले होते.

२० जुलै १९४२ रोजी बाबासाहेबांनी मजूर मंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. त्यांचा व्हॉईसरॉय कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून समावेश करण्यात आला आणि त्यांच्याकडे श्रम, जलसिंचन आणि वीज हे विभाग सोपवण्यात आले.

दुसऱ्या महायुध्दानंतरचे व्यापक विकासाचे धोरण सिंचन व वीज या विषयावर तपशीलवार धोरण तयार करण्यासाठी बाबासाहेबांनी पुढाकार घेतला. १९३५ च्या कायद्यानुसार श्रम विभागाने सिंचन व वीज विकासासाठी मुख्यत्वे तीन गोष्टी कार्यान्वित करण्याचे ठरले.

१) एकापेक्षा दोन राज्यात वाहणाऱ्या नद्यांचे नियंत्रण व व्यवस्थापन करणे

२) राज्यांमधील नद्यांवर पाणी व जल विद्युत ऊर्जा संपत्ती निश्चित करणे

३) शासकीय व तांत्रिक विकास करण्यासाठी राष्ट्रीय धोरण काय असावे ? या गोष्टींचा समावेश होता.

घटना तयार करतानाही बाबासाहेबांनी घटनात्मक तरतुदी करून ठेवल्या.

बाबासाहेबांनी घटनेचा आराखडा घटना समितीस सादर करताना पाणी हा विषय केंद्र शासनाच्या अख्त्यारीत असावा अशी भूमिका मांडली. बाबासाहेबांनी घटनेत पाणी हा विषय क्रमांक ५६ मध्ये अंतर्भूत केला त्यामुळे केंद्र शासनाला पाण्यासंबंधी कायदा करण्याचे अधिकार मिळाले. भारताच्या राज्यघटनेत ही तरतूद कलम २६२ मध्ये समाविष्ट करण्यात आली. याच तरतुदी अंतर्गत आंतरराज्य जलविवाद कायदा नदिखोर प्राधिकरण कायदा १९५६ पारित करण्यात आला.

नोव्हेंबर १९४५ मध्ये कटक येथे झालेल्या पाणी परिषदेत बाबासाहेबांनी अत्यंत मौलिक विचार देशाला दिले. पाणी आणि महापूर विनाशकारी आहे असे गृहीत धरून सुचवू नका. देशामध्ये एवढे पाणी उपलब्धच नाही की जे हानिकारक ठरू शकेल.

भारतीय जनतेला पाण्याच्या कमतरतेमुळे जास्त कष्ट सोसावे लागतात. जास्त पाण्याच्या उपलब्धेमुळे नाही. पाणी राष्ट्रीय संपत्ती असल्यामुळे पावसाळ्यात पडणाऱ्या असमतोल पावसामुळे पुराच्या जास्त पाण्याविषयी तक्रार करण्यापेक्षा या पुराच्या पाण्याचा मनुष्याच्या विकासासाठी धरणे बांधून कसा उपयोग करता येईल हा दृष्टिकोन बाळगला पाहिजे.

त्यामुळे जिथे पुरामुळे नुकसान होत असते त्या नद्यांवर ठिकठिकाणी धरणे बांधून हे पाणी समुद्राला जाऊ न देता विकासासाठी वापरणे इष्ट ठरेल असे विचार त्यांनी मांडले होते. बाबासाहेबांच्या या विचाराने प्रभावित होऊन केंद्रीय जलमार्ग, पाटबंधारे, नौकायन आयोगाचे अध्यक्ष ए. एन. खोसला यांनी महानदीवरील बहुउद्देशीय विकास प्रस्तावावर बाबासाहेबांशी चर्चा करून हिराकुड धरणाची अमंबजावणी केली.

कटक येथील पाणी परिषदेत बाबासाहेबांनी मांडलेल्या विचारांची अमंबजावणी झाली असती तर आज पडणारा दुष्काळ पडला नसता. आज नदी जोड प्रकल्पाची जी संकल्पना मांडली जात आहे ती संकल्पना मूळची बाबासाहेबांचीच होती हे खूप कमी लोकांना माहीत आहे.

ज्या समाजाला हजारो वर्ष पाण्यापासून दूर ठेवले त्याच समाजातील बाबासाहेबांनी देशवासीयांना मुबलक पाणी व वीज मिळावी यासाठी प्रयत्न केले. बाबासाहेबांशिवाय जल व्यवस्थापनाच्या बाबतीत इतका सखोल विचार कुणी केला नाही आणि दूरदृष्टीपणा दाखविलेला नाही आणि म्हणूनच बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने देशाचे हितचिंतक ठरतात.

■ ■ ■

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक व्यक्ती नसून एक विचार आहे!

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन म्हणजे भारतीय जनतेच्या न्याय व समतेसाठी लढयाची अविस्मरणीय गाथाच होय. दलितोत्ध्दारक, धर्मसुधारक, प्रकांडपंडीत, समाजशास्त्रज्ञ व संविधानाचे शिल्पकार असे विविध पैलू त्यांच्या जीवनाशी निगडीत आहेत. अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा विचार करता, तत्कालीन सामाजिक, राजकिय प्रश्नांना ते कसे सामोरे गेलेत या प्रश्ना प्रमाणेच राष्ट्रीय एकात्मतेचा विचार ही त्यांनी केला. या सर्व बाबींचा मागोवा घेणे अभ्यासाचा विषय आहे. तेव्हा आपला समाज एक संघ असला पाहिजे, यावर त्यांचा अधिक भर होता. सर्व समाज शहाणा करुन सोडावा ही त्यांची कल्पना होती. तीच त्यांनी संविधानेत साकारली. जे-जे आपणांसी ठावे, ते-ते इतरांशी सांगावे, शहाणे करुनही सोडावे सकल जण हा रामदासांचा संदेश त्यांनी आचरणात आणला आणि इतरांना सुध्दा सांगितला, याकडे डोळेझाक करुन चालणार नाही.**

--------------

स्वतः बरोबर इतरांचा विचार करुन त्यांनी राष्ट्रनिष्ठे पुढे इतर निष्ठा गौण मानल्या. आपण सर्व भारतीय आहोत ही भावना रुजविणे व वाढविणे महत्वाचे आहे. या निष्ठेपुढे कोणतीही निष्ठा स्पर्धा करु शकत नाही.

संकुचित जातीय, धार्मिक किंवा राजकिय व अन्य स्वाथार्साठी त्यांनी राष्ट्रनिष्ठा सोडली नाही. त्यांची ही भावना स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेत सहभागी होतांना (कायदामंत्री) असतांना शेडयुल्ड कास्ट फेडरेशन काढतांना, धर्मांतराची घोषणा करतांना अशा महत्वाच्या जीवनप्रसंगी सतत निष्ठा जागी राहिल्याचे दिसेल. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यांना राष्ट्रपुरुष संबोधले गेले पाहिजे.

त्याला कारण ही तसेच! ते म्हणाले, मी प्रथम भारतीय आणि शेवटपर्यंत भारतीयच! अशा महान विद्यात्याला वगळून खरोखरच हा देश मोठा झाला असता काय? याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे.

डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या लोकशाही तत्त्वांचा पुरस्कार करणारे अनेक ग्रंथ लिहिले, भाषणे दिली आणि आपली दलिताबद्दलची भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या प्रेरणेने शाळा, प्र-शाळा तर निघाल्याच पण उच्च शिक्षण देणारी महाविद्यालयेही निघाली. शिक्षण, समाजकल्याण, अर्थकरण, राजकरण या सर्वामध्ये त्यांनी आपले स्वतंत्र, तर्कशुध्द विचार मांडून दाखविले. त्यांच्या ठायी असलेल्या अर्थकारणामुळे भारतीय रिजर्व्ह बँक उदयास आली, हे ही विसरुन चालणार नाही. दलित समाजात जागृती होत गेली तेव्हा त्यांना ज्ञानाचे महत्व पटले.

अनेक दलित आज समाजात विचारवंत म्हणून मान्यता पावले आहेत, त्यामागे डॉ बाबासाहेबांची प्रेरणा आहे. समाजाने त्यांच्या विषयीचा आदर अनेक प्रकारे व्यक्त केला आहे. आज त्यांचे नाव दिलेली कितीतरी विद्यालये, महाविद्यालय, विद्यापीठे कार्यरत आहेत. ही त्यांच्या विद्वत्तेची पावती म्हणावी लागेल, जी जगमान्य ठरली. कितीतरी विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयावर डॉक्टरेट मिळविणाऱ्यांची संख्या ज्याची मोजदाद करता येणार नाही. त्यामुळे त्यांच्या विद्वत्तेची प्रचिती लक्षात येते.

डॉ. बाबासाहेबांनी बडोदे सरकारची शिष्यवृती मिळवून एल्फिन्स्टन कॉलेजात प्रवेश घेतला. कॉलेजात शिक्षण देखील भीमा महार असल्यामुळे त्याला योग्य मार्गदर्शन व मदत मिळाली नाही. तरीही तशाच परिस्थितीत भीमराव एल्फिन्स्टन कॉलेज मधून 1912 साली बी.ए. झाले. बडोद्याच्या महाराजांच्या ऋणातून अल्पसे मुक्त होण्यासाठी त्यांनी त्यांचे कडे नोकरीचा अर्ज केला त्यांना सयाजीराव गायकवाडांच्या कडे नोकरी मिळाली. परंतु वडील आजारी असल्याची तार मिळताच डॉ. आंबेडकर मुंबईस निघाले.

सुरत स्टेशनवर वडिलांसाठी बर्फी घ्यावी म्हणून ते उतरले असताना गाडी निघून गेली. त्यामुळे घरी पोहोचण्यास त्यांना उशीर झाला. वडिलांचे डोळे मुलाला पाहण्यासाठी आतूर झाले होते. मुलगा आल्याचे कळताच त्यांनी डोळे उघडले. आपल्या लाडक्या मुलाच्या अंगावरुन प्रेमाने हात फिरविला आणि त्या महान पुरुषाने हया जगाचा शेवटचा निरोप घेतला.

पुढील शिक्षणासाठी बडोद्याचे प्रागतिक राजे सयाजीराव गायकवाडांनी शिष्यवृत्ती देऊन त्यांना अमेरिकेत पाठविले. आपण केवळ शिक्षणासाठी अमेरिकेत आलो आहोत याची जाणीव भीमरावांना होती. एखाद्या तपस्व्या प्रमाणे त्यांनी उपासना केली.

ते अभ्यासात दिवसाचे अठरा तास घालवू लागले. 1915 साली ते एम.ए. झाले. पैसा जमवला व 1920 साली ते अपुरा अभ्यास करण्यासाठी पुन्हा एकदा लंडनला रवाना झाले. तिथे ते सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत निरनिराळ्या ग्रंथालयात पुस्तके वाचत आणि रात्री दहानंतर दिवस उजाडेपर्यंत त्यांचा अभ्यास चालू असे.

1923 मध्ये लंडन विद्यापीठाने त्यांना दिलेली डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी होय. त्यानंतर त्यांनी निरनिराळ्या विषयांवर दोन-तीन प्रबंध लिहिले. या कष्टांचे फळ म्हणून 1924 साली कोलंबिया विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही



पदवी दिली.

सामाजिक समतेसाठी त्यांनी महाडच्या तळयातील सर्वांसाठी म्हणजेच अस्पृश्यांना पाणी मिळत नव्हते. पाणी म्हणजे जीवन, तेच त्यांच्यापासून हिरावून घेतले यासाठी सत्याग्रह करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मार्च 1927 रोजी सत्याग्रही तळ्याकडे निघाले. माणुसकीचे हक्क व निसर्गाची देणगी जे पाणी, ते मिळवायचेच एवढयासाठी चालेले होते. डॉ. आंबेडकर सर्वांच्या पुढे होते.

अस्पृश्य म्हणून मुंबईच्या कॉलेजात ज्यांनी पाण्याचे हाल सोसले, बडोद्याच्या हॉटेलमध्ये ज्यांनी मार खाल्ला ते खरोखरच सत्याग्रहींचे सेनापती शोभत होते. सर्वजण तळयाजवळ येऊन पोहोचले. प्रथमतः त्यांनी पाण्याचा घोट घेऊन इतरांना पाणी पिण्याची मोकळीक दिली.



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

तसेच नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी 5 वर्षे सतत झगडत राहिले शेवटी 1935 मध्ये काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले. अन त्याचवेळी बौध्द धर्म स्विकारणार अशी घोषणा त्यांनी येवले (नाशिक) या ठिकाणी केली. लगेच त्यांनी सिडेनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची जागा मिळवली.

बहिष्कृत वर्गावर वर्षानुवर्षे जो अन्याय होत आलेला आहे तो वेशीवर टांगून त्याचे निराकरण झाले पाहिजे ही त्यांची मागणी होती. बहिष्कृतांचा हा लढा लढतांना त्यांनी नेमकी विधायक आणि व्यापक भूमिका घेतली आणि अस्पृश्य समाजाला काही करावेसे वाटावे या दृष्टीने त्यांच्यात चैतन्य निर्माण करायचे अशा दृष्टीने त्यांनी आपल्या कार्याची पाऊले पुढे टाकण्यास सुरुवात केली.

आपल्या भारत देशात इंग्रजांचे राज्य होते. चले जाव चा नारा देऊन इंग्रजांना देश सोडावा लागला आणि नंतर 15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र्य झाला. भारतातल्या लोकांना विशिष्ट पध्दतीने राज्यकारभार करता यावा यासाठी भारताची स्वतंत्र्य राज्यघटना असणे आवश्यक झाले. त्या दृष्टीने भारतीय विद्वानांची एक घटना (तज्ञ) समिती नियुक्त करण्यात आली. तेव्हा पं. जवाहरलाल नेहरुं व महात्मा गांधीनी ही जबाबदारी बॅरि. आंबेडकर यांच्यावर सोपविली, ती त्यांनी स्विकृत केली.

डॉ. बाबासाहेबांनी अहोरात्र जिद्द व चिकाटीने आपल्या अंगी असलेली सगळी बुध्दिमत्ता प्राणपणाला लावून 2 वर्षे 11 महिने 17 दिवसात घटना लिहून पुर्ण केली. दलित वर्गाचे पुढारी एवढ्या पुरतीच त्यांची भारतीय मान्यता नसून भारतीय स्वराज्यातील पहिले कायदेमंत्री पद त्यांना देण्यात आले.

कायदा व घटनाशास्त्राचा त्यांचा गाढ अभ्यास हा त्यांच्या जीवनाचा एक स्वतंत्र पैलू होता. 1950 पासुन राज्यघटना अंमलात आली. डॉ. बाबासाहेबांनी लिहलेल्या संविधानामुळे भारताला जगात नावलौकिक मिळाले, असे म्हटले तर अतिश्योक्ती होणार नाही. तेव्हापासुनच त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाऊ लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर जेवढी जबाबदारी होती तेवढी जबाबदारी जगातील कोणत्याही पुरुषावर नव्हती. ते जर अजुन जगले असते तर कदाचित त्यांच्या मनासारखे निश्चित घडले असते, हे कोणीही नाकारु शकत नाही आणि एवढा मोठा कायदेतज्ञ असलेल्या या महात्म्याचे पूर्वजीवन मात्र अत्यंत वाईट गेले असतांना बेदरकारपणे आगपाखड करता आली असती, पण ती सुध्दा त्यांनी केली नाही.

अशावेळी देखील बहिष्कृतांच्या चळवळीला वर्ग लढ्याचे स्वरुप येणे सहज शक्य होते, त्यातून भारतीय एकसंघतेला तडा जाऊन धर्माच्या नांवावर या देशाची शकले झाली. तशी परिस्थिती उद्भवली असती परंतू भारतीय हा त्यांचा स्थायीभाव होता. भारतीय समाजात त्यांना बदल हवा होता पण त्यासाठी समाजप्रबोधन हाच मार्ग होय, अशी त्यांची दृढनिष्ठा होती. त्यामुळेच राष्ट्रनिष्ठा त्यांनी कधी सोडली नाही. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार त्यांनी सर्वात महत्वाचा मानला.

पिकते तेथे विकत नाही हा सिध्दांत माहित आहे. तेव्हा आपल्याजवळ असलेल्या माणसाचे गुण आपण ओळखु शकत नाही, दूसऱ्या माणसाला त्याची पारख होते हे सर्वविदित आहे, म्हणूनच 1 जून 1952 रोजी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक तत्वज्ञानांचा तसेच सामाजिक/राजकिय संघषार्चा वारसा लाभलेला असल्यामुळे हा समुह मूळतः प्रस्थापित विरोधी आहे, त्यांचा हिंदु धर्मातील पाखंडी संताना विरोध होता. भारत देशावर मात्र त्यांचे अलोट प्रेम होते, त्यामुळे हिंदु धर्मातून परधर्मात जाण्याचा विचार करतानाही भारतातच उगम पावलेल्या बौध्द धर्म याची नागपूर शहरात आपल्या लाखो अनुयायासह 14 ऑक्टोंबर, 1956 रोजी बौध्द धम्माची दीक्षा घेतली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मतानुसार धर्माच्या कसोटीवर उतरणारा एकमेव धर्म आहे, तो म्हणजेच बुद्धधम्म होय. तेव्हा आपण जो धम्म घेतला तो उत्तमरीतीने पाळण्याचा निर्धार केला पाहिजे, नाहीतर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीत आणला असे होऊ नये. म्हणून आपण दृढनिश्चय केला पाहिजे हे आपल्याला साधेल तर आपण आपल्याबरोबर देशाचा इतकेच काय तर जगाचाही उध्दार करु, कारण या धर्माचे लोन जागतिक पातळीवर उंचावले आहे. भारताच्या अलिकडील इतिहासात त्यांची कामगिरी उच्च श्रेणीची व चिरस्मरणीय अशीच आहे. अन ती दिवसेंदिवस वाढतच जाणारी आहे, हे त्यांच्या प्रखर विद्वत्त्वत्तेमुळे!

बाबासाहेब म्हणजे महान चारित्र्यवान व्यक्ति, अर्थशास्त्रज्ञ, शासनशास्त्रज्ञ, इतिहासाचे विद्वान, अभ्यासक, बुध्दिमान, कायदेपंडीत, स्मृतीकार, अनेक भाषांवर प्रभुत्व असलेला प्रभावी वक्ता, संशोधक, ग्रंथकार, निधडया छातीचा व मनोधैयार्चा समाज मार्गदर्शक, भगवान बुध्दांच्या कायार्चा संदेश सर्व जगात पसरविणारा, पददलितांचे स्फूर्ती व आशास्थान अशा या जागतिक कीर्तीच्या महामानवाला १३४ व्या जयंती निमित्त मानाचा मुजरा!

***ज्ञानपिपासू युगांधराच्या***
***आठवणींना स्मरू ।***
***मिळून आपण सारे***
***साजरी भीम जयंती करू ।।***

■ ■ ■

# गरीब, विधवा, आदिवासी महिलेचे घर हडपण्याचा डाव

## करंजगावच्या जिप शिक्षकाचा प्रताप | श्रीमंत विरूद्ध गरिब आदिवासी संघर्ष



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि. 13 )** - एका विधवा आदिवासी महिलेसह तिच्या दोन मुलींना बेघर करण्याचा डाव एका शिक्षकासह त्यांच्या वडिलाने रचला आहे. या प्रकारामुळे वैफल्यग्रस्त झालेल्या महिलेने न्यायासाठी वरिष्ठांकडे आर्जव केले आहे. गरीब विरुद्ध श्रीमंत आदिवासी असा संघर्ष म्हणून या प्रकरणाकडे बघितले जात आहे.

अनिता गजानन कासदे नामक महिला शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याअंतर्गत रामनगर, करजगाव येथे वास्तव्यास असून मागील वर्षी त्यांच्या पतीचे निधन झाले आहे. त्यांना कु. लक्ष्मी (20) व निशा (16) या दोन मुली आहेत. 500 स्के. फूट जागेत त्यांची वारसा हक्काची झोपडी आहे. मोलमजुरी करून त्या आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवतात. अनिता यांचे सासरे वयोवृद्ध आहेत आणि त्यांना मद्याचे व्यसन आहे. पती निधनाने दोन मुलींसह वृद्ध सासऱ्याचे संगोपन करण्यासाठी संघर्ष करणाऱ्या अनिता यांच्यापुढे आता स्वत:चे घर वाचविण्यासाठी नवा संघर्ष सुरू झाला आहे. हक्काच्या घरातून आम्ही तसूभरही हलणार नाही, अशी भीष्मप्रतिज्ञा अनिता यांनी घेतली आहे.

अनिता ज्या झोपडीवजा घरात राहतात, ते घर रामा यांच्या नावे आहे. रामा यांच्या व्यसनाधीनतेचा आणि वृद्धापकाळाने आलेल्या मानसिक अस्वस्थतेचा गैरफायदा स्थानिक एका जि. प. शिक्षकासह त्यांच्या वडिलाने घेतला आहे. सदर शिक्षकाचे वडील चपराशी पदावर कार्यरत आहेत.

तेथील एका आदिवासी एजंटला हाताशी घेऊन दोघांनीही विधवा असाहाय्य महिलेचे झोपडीवजा घर गिळंकृत करण्याचा डाव रचला आहे. वृद्ध सासऱ्याला दारू पाजणे, सदरची झोपडी विकण्यासाठी प्रलोभन दाखवणे, दबाव टाकणे, दुचाकीवर बसवून घरातून घेऊन जाणे असे विविध फंडे सदर जि. प. शिक्षक आणि त्यांच्या वडिलाकडून सातत्याने वापरले जात आहे. हे घर ज्या ठिकाणी उभे आहे, ती जागा रामनगरात मोक्याच्या ठिकाणी आहे. त्या शिक्षकांच्या वडिलांचा पानठेला तिथेच समोर आहे. त्यामुळे असाहाय्य असलेल्या महिलेला दरडावून वेळप्रसंगी अंगावर धावून जाऊन धमकावून चूप करायचे आणि महिलेच्या वृद्ध सासऱ्याकडून जागा नावे करून घ्यायची, यासाठी जि. प. शिक्षक अजय आणि त्यांच्या वडिलांचा सुरू असलेला खटाटोप उधळून लावावा आणि संबंधितांवर कारवाई करावी, यासाठी अनिता गजानन कासदे यांनी शिरजगाव पोलिसस्टेशन, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामपंचायत करजगाव आणि दुय्यम निबंधक चांदूरबाजार यांना साकडे घातले आहे.

# प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयावर प्रहारची धडक

## महानगर प्रमुख बंटी रामटेके यांनी कुलूप तोडून केला आत प्रवेश



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 13 )** - अवैधरित्या राख वाहून नेणाऱ्या भरधाव वाहनाने अन्य वाहन चालकांच्या डोळ्यात राखेचे कण गेले. त्यामुळे वाहन अनियंत्रित होऊन एका दुचाकीला धडक दिली. यामध्ये ऋषिकेश निंभोरकर या युवकाचा जागीच मृत्य झाला होता. यातील दोषींवर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये धडक दिली. यावेळेस प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे दालन बंद होते. त्यामुळे संतप्त झालेल्या प्रहारच्या पदाधिकाऱ्यांनी बंद असलेला दारवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. यावेळी कार्यालयात चांगलीच तारांबळ उडाली. आंदोलनाची तीव्रता बघता उप प्रादेशिक अधिकारी निलेश दहीकर हे तातडीने कार्यालयात हजर झाले व प्रहारचे निवेदन स्वीकारले.

अवैधरित्या क्षमतेपेक्षा जास्त राखीने भरलेली 1000 ते 1200 वाहने महामार्गाने ये-जा करतात. काही वाहनांवर ताडपत्री झाकलेली नसते, पाणी मारलेले नसते. सदर राख उडत असल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. या अवैधरित्या सुरू असलेल्या वाहतुकीस काही राजकीय पुढाऱ्यांचे पाठबळ असल्याने त्यांच्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही होत नाही. मंगळवारी 8 एप्रिल रोजी ऋषिकेश सुभाष निभोरकर नामक युवकाचा राखेने भरलेल्या वाहनामुळे अपघात होऊन त्याचा मृत्यू झाला. त्याला जबाबदार असणाऱ्या वाहनावर कठोर कार्यवाही करून अवैधरित्या सुरू असलेली वाहतूक त्वरित बंद करण्यात यावी तसेच त्याच्या कुटूंबास वाहनधारकाकडून आर्थिक मदत मिळवून देण्यात यावी,

अशी मागणी यावेळी प्रहारच्या वतीने करण्यात आली.

रतन इंडियाच्या प्रवेश द्वारावर एकही गाडी तपासली जात नाही. गाडी किती भरलेली आहे. त्यावर काही झाकले आहे की नाही, पाणी मारलेले आहे की नाही. याची तपासणी करण्यासाठी रतन इंडियाच्या प्रवेश व्दारावर आर.टी.ओ. चौकी नेमण्यात यावी, अन्यथा कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष छोटू महाराज बसू, महानगर प्रमुख बंटी रामटेके, गजानन भुगुल, अभिजीत गोडाणे, अतुल देशमुख, नितीन किरभाते, इम्रान शहा, सचिन महले, अरविंद भुगूल, डॉ. चदाकार, निलेश सावरकर, चेतन बरहे, वाजीद भाई, साहेब खॉ भाई, तेजस शिरभाते, समिर मुला, निजी ठाकुर, प्रशांत शिरभाते, निलेश पानसे, नितीन भुयार, नितीन शिरभाते, किशोर घोडेस्वार, प्रमोद धूर्वे, कुणाल खंडारे, विक्रम जाधव आदी प्रहार कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दिखावा कारवाई बंद करा - बंटी रामटेके

निवेदन दिल्यावर प्रादेशिक परिवहन अधिकारी थातुरमातुर वाहनांवर कारवाई करून सकाळी कारवाई केलेली वाहने रात्री पुन्हा राखेच्या वाहतुकीसाठी सज्ज होतात. प्रादेशिक परिवहन कार्यालयाने सामान्य जनतेच्या भावनांचा आणि त्यांचा जीवाचा विचार करून रतन इंडियाच्या प्रवेशद्वारावर वाहन तपासणीसाठी अधिकारी, कर्मचारी तैनात करावे असे न केल्यास प्रहरच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रहारचे महानगर प्रमुख बंटी रामटेके यांनी प्रादेशिक परिवहन विभागाला दिला आहे.

# चुरणी परिसरात हनुमान जयंतीचा मोठा उत्साह

## मंदिरांमध्ये हनुमान भक्तांची मांदीयाळी

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि. 13 )** शनिवार 12 एप्रिल रोजी रामभक्त श्री हनुमंतरायाचा जन्मोत्सव चुरणी आणि परिसरातील अनेक गावांमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. परिसरातील सर्व हनुमान मंदिरामध्ये पहाटेपासूनच हनुमान जयंतीचा उल्हास दिसून आला. दिवसभर दर्शनासाठी हनुमान भक्तांच्या लांब रांगा लागल्या होत्या. अनेक मंदिरांमध्ये महाप्रसाद वितरणाचे कार्यक्रम पार पडले. हनुमान जयंती निमित्त सर्व मंदिरे भक्तांच्या गर्दीने फुलून गेली होती.

परिसरातील काही मंदिरांमध्ये हनुमान जयंतीनिमित्त महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्या अंतर्गत सात दिवस विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. शनिवारी हनुमान जयंतीला मंदिरांमध्ये पहाटे श्रींचा अभिषेक करण्यात आला. सकाळी सहा वाजता हनुमानाचा जन्मोत्सव साजरा झाला. त्यानंतर दिवसभर शेकडो भक्तांच्या उपस्थितीत विविध धार्मिक कार्यक्रम व उपक्रम पार पडत होते. शनिवारीच काही मंदिरांमध्ये आठवडाभरापासून सुरू असलेल्या महोत्सवाची सांगता झाली. दुपारी मोठ्या प्रमाणात भाविक भक्तांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. भजन, पूजन, कीर्तनाचे कार्यक्रम मंदिरांमध्ये सुरू होते. अनेक मंदिरात शुक्रवारी रात्री सुंदर कांड आयोजित करण्यात आले होते.ञहनुमान जयंतीच्या पर्वावर सामूहिक हनुमान चालीसा पठनाचे कार्यक्रम पार पडले. हनुमान मंदिरांवर आकर्षक रोषणाई व सजावट करण्यात आली होती. हनुमंत रायाला पुष्पहार, फुले, नारळ अर्पण करून तसेच बुंदीचे लाडू व इतर पदार्थांचा भोग लावून हनुमान भक्तांनी त्याची मनोभावे पूजा अर्चना केली.

# सालबर्डी मंदिराच्या मुख्य रस्त्याचे काँक्रिटीकरण करा!

## शिवभक्तांची जनप्रतिनिधींकडे मागणी





**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि. 13 )** - महाराष्ट्र-मध्य प्रदेशच्या सिमेवर वसलेल्या तिर्थक्षेत्र सालबर्डी या शिवभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या सालबर्डी येथे शासन-प्रशासन आणि जनप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे अनेक प्राथमिक सुविधांचा अभाव आहे. प्रामुख्याने मध्यप्रदेशात येणाऱ्या मुख्य रस्त्याचे मंदिराकडे जाणाऱ्या पहिल्या पायरीपर्यंतचे काम अनेक वर्षांपासून करण्यात आले नसल्याने भाविकांची प्रचंड गैरसोय होत आहे. या रस्त्याचे तात्काळ काँक्रिटीकरण करण्यात यावे, अशी मागणी शिव भक्तांकडून करण्यात आली आहे.

मध्यप्रदेश व महाराष्ट्राच्या सीमेवर सातपुडा पर्वताच्या रांगेत श्रीक्षेत्र सालबर्डी हे गाव वसलेले आहे. सालबर्डीच्या पर्वतात शेकडो फूट उंचीवर प्राचीन शिवगुफा आहे. या ठिकाणी असलेल्या प्राचीन शिवलिंगावर बाराही महिने सतत जलअभिषेक सुरू असतो त्यामुळे येथे मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील भोले भक्त व पर्यटक दर्शनासाठी येत असतात. श्रीक्षेत्र सालबर्डी मध्य प्रदेशाच्या हद्दीत असल्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीकोनातून जनप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे येथे फारसा विकास झाला नाही. मध्यप्रदेश सरकारच्या वतीने या ठिकाणी धर्मशाळा किंवा निवासाची सोय नाही. श्रीक्षेत्र सालबर्डी हे गाव मध्यप्रदेशातील मुलताई विधानसभा मतदार संघातील शेवटचे गाव आहे. त्यामुळे याकडे लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप भक्तगण करीत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून मध्यप्रदेश शासकीय दारूच्या दुकानापासून ते पहिल्या पायरीपर्यंत जाण्या-येण्याचा मार्ग प्रशासनाच्या वतीने बांधण्यात आला नाही. पावसाळ्यात या रस्त्याने दुचाकी व पायी चालणे सुद्धा कठीण होते. मध्यप्रदेश सरकारला महाशिवरात्री निमित्त भरणाऱ्या यात्रेपासून दरवर्षी लाखो रुपयांचे उत्पन्न मिळत असून सुद्धा सालबर्डी अनेक सोई सवलती पासून वंचित आहे. मध्यप्रदेश व महाराष्ट्रामध्ये भारतीय जनता पार्टीचे सरकार असून उज्जैनप्रमाणे कृती आराखडा तयार करून सालबर्डीचा विकास करण्यात यावा, अशी मागणी लोकप्रतिनिधीकडे भोले भक्त करीत आहे.

# परतवाडा एसटी आगारात महात्मा फुले जयंती साजरी



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि. 13 )** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या परतवाडा आगारात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. आगारातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. सुरुवातीला आगार प्रमुख जीवन वानखडे आणि सहकाऱ्यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

महात्मा फुले जयंती निमित्त परतवाडा आगारातर्फे विद्यार्थ्यांसाठी नियंत्रण कक्षात प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रश्नांचा समावेश होता. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. योग्य उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणादायी पुस्तके देऊन गौरवण्यात आले. यासोबतच सर्व शालेय विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारची शैक्षणिक आणि वैचारिक पुस्तके वितरित करण्यात आली. वाचन संस्कृतीला चालना मिळावी, हा त्यामागचा उद्देश होता.

या कार्यक्रमात परिवहन महामंडळाचे अनेक अधिकारी, कर्मचारी, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जीवन वानखडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. महात्मा फुले यांचे सामाजिक न्याय, स्त्रीशिक्षण आणि शोषितांसाठीचे योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

# पालकमंत्र्यांच्या निर्देशानंतर वाळू तस्करांविरुद्ध धडक मोहीम

## दैनिक महासागरच्या बातमीचा परिणाम | लोकप्रतिनिधींसह पोलीस विभाग सक्रिय




चांदुर बाजार तालुक्यात वाळु माफियांचा खुलेआम हैदोस

योजनाबद्ध पद्धतीने वाळू तस्करी

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, ( दि. 13 )** अमरावती जिल्ह्यात महसूल प्रशासन आणि पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिच्चून वाळू माफियांचा हैदोस सुरू असल्याचे व त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात अवैध मार्गाने गौन खनिजाची चोरी होत असल्याचे वृत्त दैनिक महासागर ने प्रकाशित केले होते. त्याची गांभीर्याने दखल घेऊन राज्याचे महसूल मंत्री आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधित यंत्रणांना हा गैरकायदेशीर प्रकार रोखण्यासाठी कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानंतर आता जिल्ह्यात महसूल व पोलीस प्रशासनाने वाळू तस्करी विरोधात मोहीम उघडण्याची दिसून येत आहे. काही जनप्रतिनिधी त्यासाठी सक्रिय झाल्याचे चित्र आहे.

अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे यांनीही दैनिक महासागरच्या बातमीची गंभीर दखल घेतली. त्यांनी स्वत: रस्त्यावर उतरून वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या रॉयल्टी तपासल्या, त्यानंतर पोलीस आणि महसूल प्रशासनालाही या गैर कारभाराविरोधात गांभीर्याने पावले उचलणे भाग पडत आहे. पण वाळू माफियांविरुद्धची ही धडक कारवाई व मोहीम नियमित सुरू राहणार की नेहमीप्रमाणे मध्येच बंद केली जाणार, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

अमरावती ग्रामीण पोलीस विभागाने आतापर्यंत सात ठिकाणी कारवाई करून 97 लाख 39 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रेती तस्करीचे प्रकार घडून येत असताना त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी खुद्द पालकमंत्री व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनाच प्रशासनाला निर्देश द्यावे लागले. त्यानंतर वाळू माफियांविरोधात प्रशासन सक्रिय झाल्याचे दिसून आले. तरीही हे गैरप्रकार सुरू होते. अशात अचानक आमदार प्रवीण तायडे यांनी रेतीची वाहतूक करणाऱ्या ट्रक चालकांकडील परवाने तपासले असता, त्यांना घोळ आढळून आला. तायडे यांनी हा गैरप्रकार प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर प्रशासनाला रेती तस्करी विरोधात गंभीर पावले उचलून कारवाई करणे भाग पडले आहे. वाळू तस्करीवर आळ घालण्यासाठी ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी दिलेल्या निर्देशावरून पोलीस प्रशासनाने धडक मोहीम राबविली आणि सात जणांवर कारवाई करताना 97 लाख 39 हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

अचलपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी शुभम कुमार यांनी परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत हनवत खेडा ये थील रहिवासी असलेल्या राजेश प्रल्हादराव धुळे यांच्या ताब्यातील ट्रक क्रमांक एमएच 27 / डीटी 0012 हे वाहन नाकाबंदी करून रोखले. ट्रकची तपासणी करण्यात आली असता विना परवाना बारा ब्रास वाळूची वाहतूक होत असल्याचे आढळून आले. दुसऱ्या कारवाईत अचलपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत संजय बिसन मोहनकर यांच्या ताब्यातील अशोक लेलँड हा एम एच 27 / डी एक्स 9589 क्रमांकाचा ट्रक विनापरवाना आठ ब्रास वाळूची वाहतूक करताना आढळून आला. समरसपुरा ठाण्याच्या हद्दीत रासेगाव येथे शाम सदाशिव सातपुते यांच्या ट्रक मधून अवैधरीत्या वाहून नेत जात असलेली वाळू पोलिसांनी जप्त केली. शिरखेड पोलीस ठाण्याच्या हत्तीतही अनिल अंबादास उईके याला वाळूची तस्करी करताना वाहनासह पोलिसांनी अटक केली. रमु मुंगीलाल उईके आणि उतखेडेश येथील प्रीतम उईके यांच्यासह नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शिरपूर येथे आकाश महादेव शेळके यांना ट्रॅक्टर मधून अवैधरित्या रेतीची वाहतूक करत असताना पोलिसांनी अटक केली.

अशाप्रकारे सात प्रकरणांमध्ये एकूण 97 लाख 39 हजाराचा मुद्देमाल जप्त करून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. शिवम कुमार, पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली.



# तालुका क्रीडा संकुलाला मुबलक निधी द्या!

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि. 13 )** - दर्यापूर तालुक्यात विविध क्रीडा प्रकारांमध्ये नैपुण्य प्राप्त असलेले असंख्य खेळाडू आहेत. अनेक विद्यार्थी व युवकांना क्रीडा क्षेत्रामध्ये भरारी घेण्याची इच्छा आहे. परंतु दर्यापूर तालुक्यात क्रीडा संकुल नसल्याने या क्रीडाप्रेमी युवकांची अडचण होत आहे. त्यांची ही अडचण सोडविण्यासाठी दर्यापूर येथे तालुका क्रीडा संकुलाला मान्यता देऊन जागा उपलब्ध करून देण्यात यावी आणि तात्काळ या क्रीडा संकुलाचे बांधकाम सुरू करण्यात यावे, अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांनी राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली. क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे अमरावती दौऱ्यावर असताना गोपाल अरबट आणि दर्यापुरातील शिवसैनिकांनी त्यांची भेट घेतली आणि क्रीडा संकुला संदर्भातील मागणी करिता त्यांना एक निवेदन सादर केले. या मागणीवर सकारात्मक विचार करून दर्यापुरात क्रीडा संकुलाच्या उभारणी करिता पावले उचलली जातील असे आश्वासन दत्तात्रय भरणे यांनी शिवसैनिकांना दिले, यावेळी उपजिल्हाप्रमुख सुनील केने, तालुकाप्रमुख महेंद्र भांडे, उप तालुकाप्रमुख गोपाल तराळ, सागर गेठे, राहुल भुबर, हेमंत उबाळे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# विद्यार्थ्याचा संशयास्पद मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,

नागपूर, दि. १३: शीतपेय पिल्यानंतर अचानक प्रकृती खालावल्याने एका मुलाचा मृत्यू झाला. ही घटना हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. वेदांत उर्फ विजय कालीदास खंडाते (१७) रा. निळकंठनगर, नरसाळा असे मृताचे नाव आहे. वेदांतच्या मृत्यूवरून विविध प्रकारच्या चर्चांना उधाण आले आहे.



वेदांतने नुकतीच बारावीची परीक्षा दिली होती. गत ८ एप्रिल रोजी त्याने कोणतेतरी शीतपेय प्राशन केले होते. घरी जाताच त्याची प्रकृती बिघडली आणि उलट्या होऊ लागल्या. आईने त्याला उपचारार्थ खासगी रुग्णालयात भरती केले. रुग्णालयातून एमएलसी मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याच्या आईचा जबाब नोंदविला. त्यात त्यांनी प्रकृती बिघडल्यानंतर रुग्णालयात नेल्याची माहिती दिली. वेदांत बेशुद्ध असल्याने पोलिस त्याचा जबाब नोंदवू शकले नाही. शनिवारी सकाळी उपचारादरम्यान

## चिठ्ठीने उडाली खळबळ

मिळालेल्या माहितीनुसार, खंडाते कुटुंबाची एक एकर शेती आहे. काही दिवसांपूर्वीच कुटुंबाने ती शेती विकली. या व्यवहारातून त्यांना मोठी रक्कम मिळाली होती. वेदांतवर रुग्णालयात उपचार सुरू होता. या दरम्यान १० एप्रिल रोजी त्याच्या वडिलांच्या वाहनाच्या बोनटमध्ये एक चिठ्ठी मिळाली. त्या चिठ्ठीत कुटुंबाला बरीच मोठी रक्कम मिळाल्याचे नमूद होते. कुटुंबाला धमकावून लाखो रुपयांची खंडणी मागण्यात आली होती. ती रक्कम एका ढाब्यावर पोहोचविण्यास सांगण्यात आले होते. कुटुंबाने ती चिठ्ठी पोलिसांना दिली आहे. तपासात समोर आले की, वेदांतने आपल्या एका मित्रासोबत पानठेल्यावर शीतपेय प्राशन केले होते. त्यानंतर त्याची प्रकृती खालावली, मात्र त्याच्या मित्राला काहीच झाले नाही. डॉक्टरांनुसार, वेदांतच्या शरीरात अत्याधिक प्रमाणात विष होते. कोणत्याही शीतपेयात इतक्या प्रमाणात विष टाकून त्याचे प्राशन करता येऊ शकत नाही. त्यामुळे वेदांतने स्वत: विष प्राशन केले की, कोणाच्याही तरी कटाला बळी पडला, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. पोलिस प्रकरणाचा सखोल तपास करीत आहेत.

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी; तबला: हार्मोनियमचे वितरण

## आध्यात्मिक परंपरेत भजन मंडळांचे मोठे योगदान

■ महासागर प्रतिनिधी,

नागपूर, दि. १३: नागपुरात सांस्कृतिक वातावरण निर्माण करण्यात आणि आध्यात्मिक परंपरा जोपासण्यात भजन मंडळांचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांनी केले. खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात, ना. श्री. गडकरी यांच्या हस्ते नागपूर शहरातील भजन मंडळांना तबला व हार्मोनियमचे वितरण करण्यात आले. त्यावेळी ना. श्री. गडकरी बोलत होते. यावेळी भाजपचे नागपूर शहराध्यक्ष बंटी कुकडे,



माजी आमदार प्रा. अनिल सोले, श्री. दीपक खिरवडकर, श्री. राजेश बागडी आदींची प्रमुख उपस्थिती होती. ना. श्री. गडकरी म्हणाले, नागपुरातील सर्व धर्मीयांना त्यांच्या आध्यात्मिक परंपरा जोपासता याव्यात आणि उत्तम असे सांस्कृतिक व आध्यात्मिक वातावरण नागपुरात निर्माण व्हावे, या उद्देशातून हा उपक्रम राबविण्यात येतो. आपल्या आध्यात्मिक परंपराबद्दल तरुण पिढीमध्ये गोडी निर्माण होणे आवश्यक आहे. साहित्य मिळाल्यानंतर मंडळांमधील उत्साह वाढीस लागून त्यांच्या जीवनात भजनाच्या माध्यमातून आनंद निर्माण होणे, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. नागपूर शहरातील शेकडो भजन मंडळांच्या माध्यमातून शहरात आध्यात्मिक वातावरणाची निर्मिती होत आहे. यातून पुढच्या पिढीमध्ये चांगले संस्कार रुजविण्याचे महत्त्वाचे कार्य होत आहे. सांस्कृतिक महोत्सवांतर्गत भक्ती महोत्सवाचे आयोजन करून जास्तीत जास्त नागपूरकरांना यामध्ये सामावून घेतले जाते. याशिवाय खासदार भजन स्पर्धाही दरवर्षी आयोजित करण्यात येते. नागपूर शहरातील पाचशेहून अधिक भजन मंडळांचा या स्पर्धेत दरवर्षी सहभाग असतो, याचाही ना. श्री. गडकरी यांनी उल्लेख केला.

# अ.भा. मराठी नाट्य परिषद नागपूर शाखेचे पुरस्कार जाहीर

■ महासागर प्रतिनिधी,

नागपूर, दि. १३: अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नागपूर शाखेचा वर्धापन दिन व पुरस्कार वितरण सोहळा सोमवार, १४ एप्रिल रोजी सायंकाळी ५.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, शंकरनगर चौक येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ साहित्यिक व माजी साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे भूषवतील. श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होईल.

याप्रसंगी अ. भा. मराठी नाट्य परिषद, नागपूर शाखेचे अध्यक्ष अजय पाटील आणि अ. भा. मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबईचे उपक्रम उपाध्यक्ष भाउसाहेब भोईर यांची प्रमुख उपस्थिती राहील.

या पुरस्कार वितरण सोहळ्यात संपूर्ण हयात रंगमंचावर घालविणारे ज्येष्ठ दिग्दर्शक आणि अभिनेते प्रभाकर आंबोणे यांना यावर्षीचा जीवनगौरव पुरस्कार देण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरुप राहील. तसेच ज्येष्ठ अभिनेते व दिग्दर्शक किशोर आयलवार यांना ज्येष्ठ रंगकर्मी, अभिनेत्री सीमा गोडबोले यांना श्रेष्ठ रंगकर्मी, रोशन नंदवंशी यांना रंगसेवा पुरस्कार, प्रा. राजकुमार मुसणे ( गडचिरोली ) यांना नाट्य समीक्षा पुरस्कार, चंद्रकांत चौधरी यांना

**ज्येष्ठ रंगकर्मी प्रभाकर आंबोणे यांना आज जीवनगौरव पुरस्काराचे वितरण**

सर्वोत्कृष्ट नाट्य लेखक, सुनील तितरे यांना सर्वोत्कृष्ट रंगकर्मी रंगधर्मी, रागिणी बिडकर आणि संतोष वरपल्लीवार उर्फ संतोष कुमार यांना झाडीपट्टी रंगभूमी-ज्येष्ठ रंगकर्मी पुरस्कार देण्यात येणार आहे.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२४-२५मध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध कलावंतांना सन्मानित करण्यात येईल.

त्यात सर्वोत्कृष्ट अभिनेत्री भावना चौधरी, सर्वोत्कृष्ट अभिनेता आणि दिग्दर्शक म्हणून यशवंत चोपडे, सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना प्रणव कोरे , सर्वोत्कृष्ट नेपथ्य असिधारा लांजेवार तसेच हिंदी राज्य नाट्य स्पर्धा अंतिम फेरीत पुरस्कार प्राप्त पुण्यशील लांबट, रश्मी लांडे, रोशनी सेलोकार, साक्षी नायगावकर, अक्षय गुल्हाने, मनीष चौधरी आणि बालनाट्य स्पर्धा अंतिम फेरीत रौप्यपदक प्राप्त व्यंकटेश माकडे यांना सन्मानित करण्यात येणार आहे. रसिकांनी या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन, परिषदेचे केंद्रीय उपाध्यक्ष आणि नागपूर शाखेचे प्रमुख कार्यवाह नरेश गडेकर तसेच समस्त कार्यकारिणीतर्फे करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेतर्फे नागपूरविभागाचे शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांचे अटकेचा निषेध

■ महासागर प्रतिनिधी,

नागपूर, दि. १३: दि.१२ एप्रील २५ चे च्या वर्तमानपत्रात. नागपूर विभागाचे शिक्षण उपसंचालक श्री उल्हास नरड यांना पोलिसांनी ते कुटुंबातील लग्नानिमित्त गडचिरोली येथे सुट्टीवर असताना, नागपूर शहर सदर पोलीस ठाणे पोलिसांनी लग्न प्रसंगातून आणून त्यांना अटक केली. मुन्ना वाघमारे, पालंदूर, त. लाखनी यांचे दि.११/०४/२०२५ चे सा.७ वाजेचे तक्रारीवरून त्याच रात्री त्यांना गडचिरोलीत जाऊन अटक करण्यात आली. पोलिस किती कर्तव्य दक्ष हे यावरून दिसून येते. खुनी, दरोडेखोर, गुंड पकडायला मात्र वेळ लागतो. याचा महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा निषेध करीत असून तेली समाजाचे मोठ्या पदावर असलेल्या अधिकाऱ्यास विना शासकीय चौकशी, अँटी कॅरेप्शन ची धाड नसताना, एका रंगरंगोटी करणाऱ्या पेंटर चे फिर्यादीवरून अटक केली. हे समाजाचे विरोधात भयानक षडयंत्र आहे.

नरड यांन कुठलाही खून केला नाही, कामाचे पैसे घेताना पकडले नाहीत.खुन्याला सुद्धा अटक पोलिस मागेपुढे पाहतात. आणि सन २०१० ला ते गोंदिया शिक्षणाधिकारी असताना काहीतरी चुकीचे अप्रूवल दिले. म्हणून त्याची तक्रार एका पेंटर नि कालचा सदर पोलिसाला केली.दिसते,रात्री त्यांना ताबडतोब अटक करून आपले कर्तव्य निभावले.जसे ते काही विजय माल्या, ललित मोदी, दाऊद इब्राहिम , की मुंबई बॉम्ब स्फोटातील आरोपी होते?

या बद्दल महाराष्ट्रातील तेली समाज प्रचंड नाराज असून समाजाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना विना चौकशी अटक होऊन वर्तमानपत्रात बदनामी होत असेल तर, महासभा याचा राज्यात निषेध करेल. भ्रष्टाचार करणाऱ्या शिक्षण विभागातील एक अधिकारी निलेश वाघमारे यांना काल परवा निलंबित केल्याची बातमी वर्तमानपत्रात होती, यास नरड कारणीभूत आहेत, असा कोणीतरी गैरसमज करून घेतला व सूडबुद्धीने त्यांना अटक करून त्यांची वर्तमानपत्रात व मीडियातून बदनामी चे षडयंत्र रचले तर नाही.ही सुद्धा शंका येते कारण येथे फिर्यादी पेंटर मुन्ना वाघमारे हे आहेत.तेली समाजातील अधिकारीविरोधी लॉबी महाराष्ट्रात काम करत असल्याची शंका निर्माण झाली आहे.एखादा अधिकारी गुन्हेगार असेल तर त्याला माफ करा,सोडा अशी संघटनेची भूमिका नाही.

गुन्हेगाराला शिक्षा झालीच पाहिजे, पण तक्रारीची पण चौकशी झाली पाहिजे.पण एवढे मोठे पदावर असलेल्या अधिकाऱ्यास अटक करणेसामधात काहीतरी नियम निश्चित असतील.एक पेंटर चे २०१० चे प्रकरणात ताबडतोब अटक होते हे निशेध्दार्थ आहे

तसे पाहता महाराष्ट्रात बहुतांश तेली समाज सत्ताधाऱ्यांचे मागे आहे.तेली समाजाचेभूषण वजनदार मंत्री सरकारमध्ये आहेत. तरी विनाकारण अन्याय व बदनामी. महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा चे अध्यक्ष व नेते माजी खासदार रामदास तडस हे सुधा सरकार समर्थक आहेत. त्यांनी सुद्धा याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. असा सर्व दृष्टीने सरकार समर्थक समाज असताना समाजातील लोकांवर,अधिकारी विरोधात खोटे आरोप लावून अटक व बदनामी केली जाते.हे बरोबर नाही. त्यामुळे या अटकेचा निषेध करून ते निर्दोष असतील तर त्यांना न्याय मिळावा.

अशी आज झालेल्या महासभेच्या सभेत चिंता व्यक्त करून मागणी करण्यात आली. आजची सभा प्रांतिक सहसचिव बळवंत मोरघडे यांचे अध्यक्षतेखाली नागपुरात झाली.सभेला विभागीय अध्यक्ष जगदीश गायधने, महिला अध्यक्ष सौ. नयना झाडे, युवा अध्यक्ष प्रवीण बावनकुळे, नागपूर जिल्हाध्यक्ष पुष्कर डांगरे, उपाध्यक्ष रमेश उमाटे, विनायक तुपकर, केशव सूरकर, गणेश गडेकर, चेतन देशमुख, ड घटे, सौ.वंदना साठवणे, आदि प्रामुख्याने हजर होते.

# वैमनस्यातून तरुणाची हत्या

## शेजारी राहणाऱ्या नातेवाईकानेच घेतला जीव

■ महासागर प्रतिनिधी,

नागपूर, दि. १३: जुन्या वैमनस्यातून शेजारी राहणाऱ्या नातेवाईकानेच साथीदारासोबत मिळून तरुणावर चाकूने हल्ला केला. सपासप वार करून रक्ताच्या थारोळ्यात लोळवले. यात तरुणाचा मृत्यू झाला. ही थरारक घटना शनिवारी रात्री यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत प्रवेशनगर परिसरात घडली. मोहम्मद नईम मोहम्मद वकील अंसारी (२८) रा. प्रवेशनगर असे मृताचे नाव आहे. आसिफ बबलू खान (२३) रा. प्रवेशनगर आणि रोहित शिशुपाल जगताप (२२) रा. यशोधरानगर अशी आरोपींची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नईम आणि आसिफ हे नातेवाईक असून एकमेकांच्या शेजारीच राहतात. दोघेही गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून त्यांच्यावर गुन्हेही दाखल आहेत. अनेक दिवसांपासून दोघांच्याही



कुटुंबात वैमनस्य आहे. शनिवारी सकाळी ही आसिफ आणि नईम यांच्यात भांडण झाले. यावेळी आसिफने नईमला धमकावलेही होते. नईमने त्याच्याविरुद्ध यशोधरानगर पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी दोघांनाही ठाण्यात बोलावले. त्यांच्याविरुद्ध एनसी नोंदविली आणि सायंकाळपर्यंत ठाण्यातच बसवून ठेवले. पुन्हा भांडण केल्यास कठोर कारवाईचा इशारा देऊन दोघांनाही सोडले.

रात्री ८ वाजताच्या सुमारास नईम घरासमोर उभा होता. या दरम्यान आसिफ आणि रोहित तेथे आले. पोलिसात तक्रार केल्यावरून पुन्हा शिविगाळ सुरू केली. पुन्हा दोघांमध्ये भांडण सुरू झाले. आसिफ आणि रोहितने तीक्ष्ण चायना चाकूने नईमवर हल्ला केला. पोटात चाकू भोसकून रक्ताच्या थारोळ्यात लोळवले. नईम जागीच कोसळला. कुटुंबीयांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली आणि नईमला उपचारार्थ रुग्णालयात घेऊन गेले. उपचारादरम्यान नईमचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच यशोधरानगरचे ठाणेदार रमेश खुणे पथकासह घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी आसिफ आणि रोहितला ताब्यात घेतले. डीसीपी निकेतन कदम यांनीही घटनास्थळाला भेद दिली. दिवसा झालेल्या वादानंतर काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती वरिष्ठ अधिकारी घेत आहेत. नईमचे कुटुंबीय पोलिसांवर आसिफला सोडल्याचा आरोप करीत आहेत. रात्री उशिरापर्यंत तपास सुरू होता.

# एसयूव्हीच्या धडकेत वृद्ध ठार

नागपूर, दि. १३: भरधाव एसयूव्हीच्या चालकाने दिलेल्या धडकेत एका वृद्धाचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. ही घटना कपिलनगर पोलिस ठाण्यांतर्गत कामठी रोडवर घडली. मृताची ओळख पटू शकली नाही. वय अंदाजे ६० ते ६५ वर्षे आहे. उप्पलवाडीच्या गोविंदगड परिसरात राहणारे शेख निजामुद्दिन शेख रमजान (६२) हे शनिवारी सकाळी ६.४५ वाजताच्या सुमारास त्यांच्या एमएच-४९/एई-३३क्रमांकाच्या एसयूव्ही वाहनाने टिपू सुल्तान चोकातून घरी जात होते. ऑटोमोटिव्ह चौकात मेट्रो स्थानकाजवळून गाडी यूटर्न घेताना अचानक वृद्ध पुढे आले आणि त्यांना जबर धडक बसली. यात वृद्ध गंभीर जखमी झाले. निजामुद्दिन यांनी तत्काळ त्यांना गाडीत टाकले आणि उपचारार्थ कामठीच्या उपजिल्हा रुग्णालयात घेऊन गेले. तेथे डॉक्टरांनी तपासून वृद्धाला मृत घोषित केले. मृतकाची ओळख पटू शकली नाही. त्यांच्या अंगात स्वेटर आणि धोतर आहे. तसेच हातावर काहीतरी गोदलेले आहे. या प्रकरणी पोहवा कैलाश मैंद यांच्या तक्रारीवरून निजामुद्दिनविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.


महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,

सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. ३,

ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर, सिव्हील लाईन्स, नागपूर-१.

Email :- div3nagpur.ee@mahapwd.gov.in    दुरध्वनी क्र. (0712) 2561586

**ई - निविदा सुचना क्रमांक 01 /2025-26**

जावक क्रमांक : 1158 /निविदा, दिनांक :- 04.04.2025

कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग क्र.३, सिव्हील लाईन्स, नागपूर हे महाराष्ट्र शासनाचे वतीने कुठल्याही सक्षम **कंत्राटदार/अभिव्यक्ति कडून** खालील कामाकरिता **आरएफपी/ब-१ नमुन्यात** ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http:// mahatenders. gov.in येथुन डाउनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत (रू लक्षात) | निविदा प्रपत्र किंमत ( रूपये ) (जीएसटी करासह) | काम पुर्ण करण्याचा कालावधी (महिने) | ई निविदा फार्म |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| 1 | अंभोरा येथे पर्यटकांकरीता व्हीव्हींग गॅलरी वरील सोई-सुविधा करणे, व्यवस्थापन व देखभाल इ. सोई पुरविणे ता. कुही जि. नागपूर | 60.00 | 1180 | 12 | आरएफपी |
| 2 | मांगली जुनेवानी रस्त्यावर किमी १/०० मध्ये लहान पुलाचे पोचमार्गासह बांधकाम करणे ग्रामा ७४ ता. हिंगणा जि. नागपूर | 165.00 | 1180 | 18 | ब-१ |

ई-निविदा डाउनलोड व विक्री कालावधी :- दिनांक 15.04.2025 to 22.04.2025

निविदा पुर्व बैठक :- दिनांक 16.04.2025 रोजी 16.00 वाजता मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे कार्यालयात

ई- निविदा (तांत्रिक लिफाफा ) उघडणे :- दिनांक 24.04.2025 ठिकाण :- अधिक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, नागपूर यांचे कार्यालयात

**खालील संकेतस्थळावर ई-निविदांची सर्व माहिती उपलब्ध राहिल.**

१) http://mahatenders.gov.in
२) कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग क्र.३, सिव्हील लाईन्स, नागपूर कार्यालयातील सुचना फलक.
३) निविदा प्रपत्रातील अटी/शर्ती प्रत्येक निविदाकारास लागु/बंधनकारक राहतील. निविदा सुचनेतील कामासंबंधात कोणताही बदल फक्त http://mahatenders.gov.in या साईटवरच प्रकाशित केल्या जाईल.
४) निविदा शक्यतो निश्चीत दिवशी उघडण्यात येतील. काही अपरिहार्य कारणास्तव निश्चीत दिवशी उघडणे शक्य न झाल्यास त्या पुढील कार्यालयीन कामाकाजाचे दिवशी उघडण्यात येईल.

( वैशाली गोडबोले )
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.३,
नागपूर

DGIPR-2025-26/No-5/C173


# शेवगा लागवडीने ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना

■ महासागर प्रतिनिधी,

नागपूर, दि. १३: महात्मा फुले दांपत्याला मरणोत्तर संयुक्तपणे भारत रत्न पुरस्कार देण्यासाठी केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण संघ रजिस्टर महाराष्ट्र तर्फे महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त कॉटन मार्केट चौक नागपूर येथे पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून धरणे आंदोलन करण्यात आले.




महाराष्ट्र राज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण संघ रजिस्टर महाराष्ट्र चे सरचिटणीस भूषण दडवे, उपाध्यक्ष राम गोविंद खोब्रागडे, जिल्हा सचिव प्रकाश कुंभे, किशोर बिर्ला, सौ. माया घोरपडे, रंगारी आदि पदाधिकारी उपस्थित होते गेल्या २५ वर्षांपासून केंद्र सरकारची उदासीनता व टाळाटाळ होत आहे. आता तरी दिनांक २३ मार्च२०२५ ला विधानसभेत प्रस्ताव व ठराव मंजूर करण्यात आला आहे त्याची दखल घेऊन महात्मा फुले दांपत्याला मरणोत्तर संयुक्तपणे भारत रत्न घोषित करावा अशी मागणी करण्यात आली. यापूर्वी ही प्रस्ताव व ठराव पाठविण्यात आले आहेत.

## समृद्धी महामार्गावर बिबट्याचे वेगवान रेस्क्यू ऑपरेशन

**नागपूर :** समृद्धी महामार्ग त्याच्या निर्मितीपासून तर त्यावरून वाहतूक सुरू झाल्यानंतरसुद्धा कायम वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. येथे माणसांचे अपघात अजूनही थांबलेले नाहीत, पण प्राण्यांचे देखील अपघात होतच आहेत. रविवारी समृद्धी महामार्गावर नाही पण महामार्गाच्या खाली वन्यप्राण्यांसाठी तयार केलेल्या उपशमन योजनांजवळचा बिबट अडकला. महामार्गापासून खाली बराच अंतरावर ही घटना घडली असताना देखील ट्रान्झिट ट्रीटमेंट केंद्राच्या चमूने अवघ्या अर्ध्या तासात हे रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी केले.


हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर झिरो पॉईंट टोल बूथ च्या भागात मुंबईवरून नागपूरकडे येताना महामार्गाच्या बाजूला वन्यजीवांसाठी बनवलेल्या भुयारी मार्ग तयार करण्यात आला आहे.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **FARZANA DOASANI.** NOW MY NEW NAME IS **FARZANA IMTIYAZ DOSANI.** **ADD** : REMAT NAGAR CHANDRAPUR.
PASSPORT NO. J6003082.

MY OLD NAME WAS **JYOTI JAISINGH.** NOW MY NEW NAME IS **HANSIKA CHIRAG CHANDANI.** **ADD** : FLAT NO 205, CHANDRALOK BUILDING C A ROAD, NAGPUR 440018.


## दवाखान्यातून रोकड चोरी



नागपूर, दि. १३: चोरांनी एका डॉक्टरच्या दवाखान्याचे कुलूप तोडून सव्वालाखाची रोकड चोरून नेली. ही घटना धंतोली पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी डॉ. संकेत शरद पेंडसे (४२) रा. धंतोली उद्यानाजवळच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. डॉ. संकेत यांचे घरीच पहिल्या माळ्यावर पेंडसे मधुमेह क्लिनिक आहे. गुरूवारी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास त्यांनी दवाखाना बंद केला आणि घरी गेले.

मध्यरात्रीला चोरांनी दवाखान्याच्या दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेली १ लाख २५ हजार रुपयांची रोकड चोरून नेली. शुक्रवारी सकाळी डॉ. संकेत दवाखाना उघडण्यासाठी गेले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली.

धंतोली पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## निधन

### अतुलचंद्र सुनेरी



नागपूर, दि. १३: शहराच्या बजरिया भागातील रहिवासी अतुलचंद्र सुनेरी यांचे वयाच्या व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात मोटा आप्तपरिवार आहे . त्यांच्या पार्थिववार सोमवार एप्रिल रोजी मोक्षधाम (घाट रोड) येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील.

## १४ एप्रिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला पाहिजेत.स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतीज्ञ,तत्वज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, वकील अशा महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८४१ रोजी महु इथे झाला व संपूर्ण भारतवर्षे सुर्यासारखे लखलखायला लागले.जनुकाय बाबासाहेबांच्या रूपात या पृथ्वीतलावर दैवी शक्तीच प्रगट होवून ज्ञान जोत प्रगटली की काय असे सर्वांनाच वाटत होते. बाबासाहेबांनी समाजाच्या हितासाठी आणि देशहीतासाठी आपले प्राणपनाला लावले. त्यामुळेच त्याच्या अथक प्रयत्नाने संविधानाच्या चौकटीत संपूर्ण भारताला बांधून ठेवले व लोकशाही निर्माण केली.आज प्रत्येकाला संविधानाच्या माध्यमातून न्याय मिळत असतो.आजही अनेक देशांमध्ये हुकूमशाही दीसुन येते.परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच भारतीय लोकशाही टीकुन आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील लोकांना न्याय मिळावा यासाठी अहोरात्र प्रयत्न केले.तेव्हाच भारतात न्यायव्यवस्था प्रस्थापीत झाली.कारण बाबासाहेबांना कल्पणा होती की काही मुठभर समाज देशातील सर्वसामान्यांना कलंकीत करण्याचे काम करीत आहे.परंतु बाबासाहेबांचे या संपूर्ण हालचालींवर लक्ष होते. याकरीता समाजात जातीयवाद, धर्मवाद,पंथवाद यात कटुता निर्माण होवू नये याकरिता सर्वांना एकत्र आणन्याचे काम त्यांनी केले.आज जगामध्ये अनेक देशात बाबासाहेबांच्या विचारांची जोपासना केली जाते.कारण बाबासाहेबांच्या विचारांमध्ये ज्ञाणाचा व बुध्दीमत्तेचा अथांग महासागर आहे.त्याची आपण कल्पना सुध्दा करु शकत नाही.त्याची तुलना समुद्रापेक्षाही अफाट आहे.कारण त्यांच्या बुद्धीमत्तेचा व कौशल्याचा संपूर्ण जगात आजही गुणगान होतांना आपण पहातो.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानयोगी असल्यामुळे त्यांची कला जगात कोणीही अवगत करू शकले नाही.आज भारतात संपूर्ण समाज आनंदाने रहातो व बागडतो ते फक्त बाबासाहेबांच्या विचारांमुळे व संविधानामुळेच. बाबासाहेबाचा जन्म गरीब घराण्यात झाला असला तरी ते मनाने व विचाराने खूप श्रीमंत होते.आज प्रत्येकाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांने प्रेरीत होऊन देश घडवीण्याकरीता पुढाकार घेण्याची गरज आहे.कारण बाबासाहेबांच्या विचाराने भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला मोठी प्रेरणा दिली आहे.त्यामुळे आज जगातील प्रत्येक देशात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर केल्या जातो.परंतु आजचा राजकीय पुढारी बाबासाहेबांचे विचार विसरुन समाजाच्या प्रगतीकडे लक्ष न देता स्वतःची प्रगती करतांना दिसत आहे.याचे दु:ख बाबासाहेबांना अवश्य होत असावे. बाबासाहेब आंबेडकर,ज्योतीबा फुले इत्यादी अनेक थोर महापुरुषांनी व विचारवंत देश सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी अथक प्रयत्न केले व १४४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु गेल्या काही वर्षांत मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी भ्रष्टाचार करून वाममार्गाने मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचलसंपत्ती कमवुन देशाच्या १४०कोटी जनतेच्या खांद्यावर महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या,महागडे शिक्षणाचे ओझे लादले आहे.याचे दु:ख बाबासाहेबांना अवश्य होत असेल.स्वत:ला लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी व स्वयंघोषित समाजसेवक समजणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनो आपण वाममार्गाने कमविलेली करोडोंची चल-अचलसंपत्ती सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावी.असे जर कार्य राजकीय पुढारी करीत असेल बाबासाहेबांना राजकीय पुढाऱ्यांची खरी आदरांजली होईल.कारण बाबासाहेबांनी समाज हितासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले याला कुठेही तडा जाणार नाही याची जाण आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी ठेवायला पाहिजे. बाबासाहेब आंबेडकर आपले सर्वांचेच दैवत आहे.त्यामुळे जयंतीच्या निमित्ताने देशातील प्रत्येक व्यक्तीने, प्रशासनाने व सरकारने वृक्षारोपणाचा संकल्प केला पाहिजे.कारण दिवसेंदिवस निसर्गाचा ह्यास होत आहे.त्यामुळे निसर्गाला वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.त्यामुळे १४एप्रिलला वृक्षारोपण व्हायला हवे यामुळे एकाच दिवशी देशात लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल आणि संपूर्ण निसर्ग प्रफुल्लित होईल व प्रत्येक झाडात, पानात व फुलात आपल्याला बाबासाहेबांचे दर्शन अवश्य होईल.

रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.४४२१६४०७७४, नागपूर.

# गडकरींचा थेट जिल्हाधिकाऱ्यांना फोन




प्रश्नच मार्गी लागला!

■ महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि. १३ :
केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रमात ऑन दि स्पॉट निकालावर भर असतो. रविवार १३ एप्रिल रोजी पुन्हा एकदा त्याची प्रचिती आली.

बुलढाण्यातून आलेल्या दिव्यांगांना मदत व्हावी यासाठी गडकरींनी थेट जिल्हाधिकाऱ्यांना फोन केला. थोड्याच वेळात मंत्र्यांचे पत्र सोबत आलेल्या दिव्यांगांना सोपवण्यात आले. तसेच मदत मिळण्याचा मार्गही मोकळा झाला.

खामला येथील जनसंपर्क कार्यालयात नागरिकांनी सकाळपासूनच गडकरी यांना भेटण्यासाठी गर्दी केली होती. कुणी वैयक्तिक तर कुणी प्रशासकीय अडचणींच्या संदर्भात निवेदने दिली. यातच बुलढाण्याहून मतिमंद निवासी विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत मिळावी असे निवेदन काहींनी दिले.

त्यानंतर गडकरी यांनी बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांना फोन लावला. त्यांना केंद्र सरकारच्या ॲडीप योजनेतून दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत करण्याची सूचना केली. विशेष म्हणजे अगदी काही मिनिटांतच गडकरी यांच्या कार्यालयातून जिल्हाधिकाऱ्यांना पत्रही गेले. त्यावेळी निवेदन देण्यासाठी आलेल्या दिव्यांगांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव होते.

नागपुरातील अयोध्यानगर परिसरातील काही नागरिकांनी नाल्याचे पाणी वस्तीत शिरत असल्याचा मुद्दा निवेदनाद्वारे मांडला. यासंदर्भात गडकरी यांनी त्याच क्षणी मनपा आयुक्तांना फोन करून परिस्थितीची माहिती दिली आणि तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. काही नागरिकांनी गेल्या जनसंपर्क कार्यक्रमात दिलेल्या निवेदनावर कार्यवाही झाल्याचे सांगत आभार मानले. यावेळी पदाधिकारी उपस्थित होते.

## २ अल्पवयीन मुलींवर खासगी वसतिगृहात अत्याचार

### मुलांना बेदम मारहाण : ५ जणांवर गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :
कल्याणमध्ये धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पसायदान नावाच्या खासगी वसतिगृहात २ अल्पवयीन मुलींवर अत्याचार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. तर शाळेतील मुलांना अनेक दिवसांपासून मारहाण केली जात असल्याची बाब उघडकीस आली आहे.

जिल्हा महिला बाल कल्याण समितीकडून पाहणीदरम्यान हा प्रकार समोर आला आहे. या घटनेची माहिती मिळताच टिटवाळा पोलिसांनी घटनास्थळ गाठत कारवाई सुरू केली असून या प्रकरणी आत्तापर्यंत पाच जणांना अटक केली आहे. यात आश्रम शाळा चालवणारा संचालक बबन शिंदे, त्याचा मुलगा प्रसन्न शिंदे, त्याची पत्नी आशा शिंदे , शिक्षिका दर्शना पंडित आणि कामगार प्रकाश गुप्ता यांचा समावेश आहे.

खडवलीली पसायनदान या खाजगी आश्रम शालेत बेघर, निराधार आणि गोर-गरीब मुलांना शिक्षण दिले जाते. काही दिवसांपूर्वी खडवली येथील खासगी आश्रम शाळेत मुलांना बेदम मारहाण केली जात असल्याची तक्रार ठामे जिल्हा महिला बाल कल्याण समितीकडे प्राप्त झाली होती. तक्रारीची गंभीर दखल समितीच्या अधिकाऱ्यांनी घेतली. समितीच्या अधिकारी वर्गाने थेट पसायदान या खाजगी आश्रमशाळेची पाहणी केली. या वसतिगृहात १२ ते १५ मुलं राहतात त्यांच्याकडे समितीच्या सदस्यांनी विचारपूस केली. तेव्हा मुलांना मारहाण केली जात होती. प्रकाश गुप्ता या कर्मचाऱ्याने दोन अल्पवयीन मुलींवर लैगिंक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

या घटनेमुळे कल्याण तालुक्यात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. निराधार मुलांवर अत्याचार करणाऱ्या या नराधमांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. कल्याण तालुका पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

सुटका करण्यात आलेल्या बालकांपैकी काही खडवली येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत होते. त्यांची आगामी परीक्षा लक्षात घेता शिक्षण विभागाने त्यांच्या परीक्षेसाठी विशेष व्यवस्था करावी, यासाठी शिक्षणाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधण्यात येत आहे.

बालकल्याण समितीच्या आदेशानुसार सर्व बालकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. सध्या या बालकांना उल्हासनगर येथील मुलींच्या विशेष गृहात ठेवण्यात आले आहे, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संतोष भोसले यांनी सांगितले.

## शहरात सर्वत्र भीमजयंतीचा उत्साह

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नागपूर शहरासह ग्रामीण भागात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे जयंतीच्या पर्वावर दीक्षाभूमी येथे जनसागर उसळणार असून, नागपूर शहरात शंभरापेक्षा अधिक ठिकाणी भोजनदानाचा कार्यक्रम होणार आहे. अनेक भागात सूगम गीत गायन आणि इतरही कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री रवाना होताच आगीचा भडका



■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १३ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अन्य मंत्री रविवारी आर्वीत हजर असतांनाच एक मोठी दुर्घटना घडली. तळेगाव रस्त्यावर मुख्यमंत्र्यांचा कार्यक्रम होता. तर याच तळेगाव टी पॉईंट ईथे आगीचे लोळ उसळले होते.

येथे भिंदर परिवाराची क्रिकेट अकादमी आहे. त्या ठिकाणी शॉर्ट सर्किट मुळे आग भडकली होती. पण प्रथम परिसरातील गावकरी जमा होत त्यांनी आपल्या परीने आग विझविण्याचा प्रयत्न केला. या घटनेची माहिती मिळताच मुख्यमंत्री फडणवीस यांना निरोप देत परत येत असलेले पालकमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर व आमदार सुमित वानखेडे हे आग लागल्याचे कळताच घटनास्थळी पोहचले.

त्यांनी सर्व ती माहिती घेत अग्निशमन यंत्रनेस सूचित केले. त्वरित तिवसा, वर्धा, पुलगाव व आर्वी येथील अग्निशमन दल गाड्यांसाह दाखल झाले. या यंत्रनेने शथीर्चे प्रयत्न करीत आग आटोक्यात आणली.

## समृद्धीवर बिबट्याचे रेस्क्यू ऑपरेशन..



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
समृद्धी महामार्ग त्याच्या निर्मितीपासून तर त्यावरून वाहतूक सुरू झाल्यानंतरसुद्धा कायम वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. येथे माणसांचे अपघात अजूनही थांबलेले नाहीत, पण प्राण्यांचे देखील अपघात होतच आहेत.

रविवारी समृद्धी महामार्गावर नाही पण महामार्गाच्या खाली वन्यप्राण्यांसाठी तयार केलेल्या उपशमन योजनांजवळचा बिबट अडकला. महामागार्पासून खाली बराच अंतरावर ही घटना घडली असताना देखील ट्रान्झिट ट्रीटमेंट केंद्राच्या चमूने अवघ्या अर्ध्या तासात हे रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी केले.

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर झिरो पॉईंट टोल बूथ च्या भागात मुंबईवरून नागपूरकडे येताना महामार्गाच्या बाजूला वन्यजीवांसाठी बनवलेल्या भुयारी मार्ग तयार करण्यात आला आहे.

या भुयारी मार्गाला लागून असलेल्या शेताच्या तारेच्या कुंपणात बिबट अडकला. बुटीबोरीचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रमोद वाडे यांनी तातडीने नागपूर येथील प्रादेशिक वनखात्याच्या अखत्यारीतील ट्रान्झिट ट्रीटमेंट केंद्राला फोन केला आणि घटनेची माहिती दिली.

केंद्राची चमू तातडीने घटनास्थळी पोहचली. सर्व परिस्थितीचा अंदाज घेऊन बिबट्याला फिजिकली रेस्क्यू करण्याचा निर्णय घेतला. कॅचपोलच्या साहाय्याने बिबट्याचे पाय आणि मान फिक्स करण्यात आली. यावेळी महामार्गावर ट्रान्झिट ट्रीटमेंटकेंद्राचे वाहन तयारच ठेवण्यात आले.

बिबट्याला बेशुद्ध न करताच यशस्वीरित्या कुंपणातून सोडवून केंद्राच्या रेस्क्यू वाहनात टाकण्यात आले. तारेच्या कुंपणात अडकल्याने बिबट्याच्या शरीरावर किरकोळ जखमा झाल्या होत्या. त्यामुळे उपचारासाठी त्याला ट्रान्झिट ट्रीटमेंट केंद्रात आणले. या महामार्गालगत वन्यप्राणी आढळून आल्याच्या घटना यापूर्वीही समोर आल्या आहेत. तथापि, महामार्गालगत बिबट असल्याचे पहिल्यांदाच दिसून आले.

## पत्नीच्या प्रियकराकडून दोन मुलांचा जन्म

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
नागपूर येथे एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. एका पतीला त्याची पत्नी प्रियकराकडून दोन मुलांना जन्म देऊनही तिला पोटगी द्यावी लागत असल्याची घटना उघडकीस आली आहे.

२०१५ मध्ये विवाह झालेली पत्नी केवळ २८ महिने पतीसोबत राहिली. २०१६ मध्ये मुलीचा जन्म झाला आणि २०१७ मध्ये तिने पतीविरुद्ध न्यायालयात तीन याचिका दाखल केल्या. पहिली कौटुंबिक हिंसाचाराची, दुसरी कलम १२५ अंतर्गत पोटगीची आणि तिसरी घटस्फोटाची.

### तरीही पत्नीला पोटगी?

पत्नी पीडित संघटनेचे अध्यक्ष आनंद बागडे यांनी सांगितले की, दोन्ही मुलांच्या जन्मदाखल्यांवर प्रियकराचे नाव जन्मदाता म्हणून असूनही न्यायालयाने हा पुरावा ग्राह्य धरला नाही. पत्नीने पोलिसांसमोर विवाहबाह्य संबंध कबूल केले, मात्र न्यायालयात तिच्या वकिलांनी वेगळीच बाजू मांडली.

पीडित पिता आपल्या मुलीला भेटण्यासाठी तरसत आहे. मुलगी तेरा महिन्यांची असतानाच पत्नी प्रियकरासोबत निघून गेली. न्यायालयाने परिसरात मुलीला भेटण्याची परवानगी दिली असली तरी पत्नी कधीच तारखेला उपस्थित राहत नाही. २८ मार्चला नऊ वर्षे पूर्ण झालेल्या मुलीला पिता अजूनही डोळेभरून पाहू शकलेला नाही.

आनंद बागडे यांनी राज्य आणि राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर पुरुष आयोग स्थापन करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, कायद्याने सामाजिक आणि कौटुंबिक प्रश्न सुटत नाहीत. सीआरपीसीचे कलम १२५ हे संपूर्ण कुटुंबासाठी असूनही त्याचा गैरवापर होत असल्याचे त्यांनी नमूद केले. न्यायालाचे काही निकाल विचित्र असतात, अशी प्रतिक्रिया काहींनी व्यक्त केली आहे.

## डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांना बाबांचे शिलेदार सन्मान



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :
डॉ. राममनोहर लोहिया वाचनालय व श्रीमती उषाराणी अध्ययन कक्ष (माजी विद्यार्थी) कौटुंबिक स्नेहमिलन कार्यक्रम 'उमंग २०२५' मध्ये प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मुरलीधर मेश्राम यांचे संविधान जनजागृतीच्या विशेष उल्लेखनीय कार्यासाठी बाबांचे शिलेदार हा सन्मान देऊन गौरवण्यात आले.

समाज कल्याण उपायुक्त डॉ. सिद्धार्थ गायकवाड व त्यांच्या सुविद्य पत्नी रोशनी गायकवाड तसेच जीएसटी विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय थूल यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्वेंशन सेंटर नागपूर येथे आयोजित समारंभात डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांना सन्मानित करण्यात आले.

याबद्दल डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## लोकार्थ

### एकॉर आणि इंटरग्लोब यांच्यात महत्त्वपूर्ण भागीदारी



भारताच्या आतिथ्य क्षेत्राचा कायापालट करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, जागतिक आतिथ्य क्षेत्रातील आघाडीची कंपनी एकॉर आणि भारतातील आघाडीचा पर्यटन समूह इंटरग्लोब यांनी भारताच्या सर्वात झपाट्याने वाढणाऱ्या हॉस्पिटॅलिटी एन्टरप्राइझचे सर्जन करण्यासाठी आपली भागीदारी अधिक दृढ केल्याची घोषणा केली, जे एक बेजोड नेटवर्क, ब्रँड्सचा एक पोर्टफोलियो आणि सर्व मार्केट सेगमेन्ट्समध्ये वितरण प्रदान करेल.

भारतात वेगाने वाढत असलेला आतिथ्य बाजार काबिज करण्यासाठी आणि या उद्योगातील जागतिक नेत्यांची ताकद एकत्रित करण्याच्या महत्त्वाकांक्षेसह हा नवीन प्लॅटफॉर्म 2030 पर्यंत एकॉर ब्रँड अंतर्गत 300 हॉटेल्सच्या नेटवर्कचे लक्ष्य ठेवेल.या ऐतिहासिक भागीदारीत प्रत्येक हितधारकाच्या अद्वितीय शक्ती सामावल्या आहेत एकॉर एक आघाडीचा जागतिक आतिथ्य समूह आहे, ज्याने गेल्या काही वर्षांपासून भारतात एक प्रभावशाली उपस्थिती स्थापित केली आहे.या युतीच्या माध्यमातून एकॉर आपल्या फुटप्रिंटचा लक्षणीय विस्तार करेल आणि संचालन सुव्यवस्थित करेल.

इंटरग्लोब एक आघाडीचा भारतीय समूह आहे, जो प्रवास आणि आतिथ्य या क्षेत्रात आपले बेजोड नैपुण्य प्रस्तुत करतो. तसेच, हवाई वाहतूक (इंडिगो), हॉटेल्स,एअरलाइन व्यवस्थापन, लॉजिस्टिक्स, प्रवास आणि अक सक्षम टेक्नॉलॉजीत त्यांचा एक सिद्ध एंटरप्राइझ ट्रॅक रेकॉर्ड देखील आहे. इंटरग्लोब हा इंडिगो या भारतातील सर्वात मोठ्या एअरलाइनचा सर्वात मोठा स्टेकहोल्डर आहे. इंडिगोकडे 400 एकरक्राफ्ट आहेत, जी 130 शहरांना रोज 2200 नियमित उड्डाणांमार्फत जोडतात. 2025 या आर्थिक वर्षात याएअरलाइनने 118 मिलियन प्रवाशांना आपल्या इच्छीत स्थानी पोहोचवले आहे. ■ ■

### स्विगी इन्स्टामार्टची ऑर्डरवर बचत मिळवण्यासाठी मॅक्ससेव्हर योजना



भारतातील आघाडीची क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म स्विगी इन्स्टामार्ट, जी नुकतीच देशातील 100 शहरांमध्ये विस्तारली आहे, तिने आज मॅक्ससेव्हर या नव्या इन-ॲप फीचरचा शुभारंभ केला आहे. हे फीचर खास करून वापरकर्त्यांना जास्त बचत आणि अधिक मूल्य देण्यासाठी तयार करण्यात आले आहे.प्रत्येक ग्राहक आपोआप मॅक्ससेव्हर योजनेत सामील होतो. ठराविक ऑर्डर अमाउंटनंतर ग्राहकांना ५०० रूपयांपर्यंतची अतिरिक्त बचत मिळण्याचा लाभ मिळू शकतो. स्विगी मॅक्ससेव्हरच्या मदतीने ग्राहकांना सर्व श्रेणींमधील वस्तूंवर सर्वोत्तम किंमतीचा लाभ घेता येतो. सध्या स्विगी इन्स्टामार्टकडे 35,000 पेक्षा जास्त उत्पादने उपलब्ध आहेत, ज्यामध्ये किराणा सामान, दैनंदिन वापराच्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स, स्मार्टफोन्स, फॅशन, मेकअप, खेळणी आणि इतर अनेक गोष्टींचा समावेश आहे आणि ही सर्व उत्पादने केवळ 10 मिनिटांत घरपोच दिली जातात. ■

### बिर्ला ओपस पेंट्स डिझायनर फिनिशची नवीन श्रेणी लॉंच

आदित्य बिर्ला ग्रुपच्या ग्रासिम इंडस्ट्रीजचा भाग असलेल्या बिर्ला ओपस पेंट्सने डिझायनर फिनिशची एक नवीन आणि नाविन्यपूर्ण श्रेणी लॉंच केली आहे ज्यामध्ये दोन विशेष आणि भविष्यकालीन संग्रह आहेत जे भारतातील प्रीमियम इंटीरियर डिझाइनिंगमध्ये बदल घडवून आणतील. लक्झरीची पुनर्परिभाषा करण्यासाठी तयार केलेली ही नवीन श्रेणी ब्रँडने त्यांचे फ्रँचायझी स्टोअर्स तसेच कंपनीच्या मालकीचे कंपनी-संचालित अनुभव स्टोअर्स - बिर्ला ओपस पेंट स्टुडिओ - लॉंच करून त्यांचा रिटेल व्यवसाय वाढवल्याच्या मागे आहे, ज्यामुळे ग्राहकांना डिझायनर फिनिश श्रेणीचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल. या उत्कृष्ट श्रेणीत दोन संग्रह सादर केले आहेतः ड्रीम कलेक्शन आणि टाईमलेस कलेक्शन, प्रत्येक संग्रह निसर्ग-प्रेरित भव्यता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे वेगळे मिश्रण प्रदान करतो. हाय-डेफिनिशन थ्रीडी पॅटर्न आणि मेटॅलिक ब्रिलियंसपासून ते कालातीत आणि हस्तनिर्मित फिनिशपर्यंत, बिर्ला ओपस पेंट्सचे डिझायनर फिनिश भिंतींना परिष्कृतता आणि खोलीसह जिवंत करेल. ज्यांना फक्त रंगांपेक्षा जास्त हवे आहे त्यांच्यासाठी डिझाइन केलेले, डिझायनर फिनिश जागेचे वैयक्तिक शैली आणि पर्यावरणाविषयी जागरूक राहणीमानाच्या अभिव्यक्तीमध्ये रूपांतर करते, तसेच अतिरिक्त टिकाऊ आणि अधिक श्रेष्ठ असते, बिर्ला ओपस पेंट्सच्या दुनिया को रंग दो हा दृष्टिकोन दर्शविते.दोन्ही कलेक्शन्स पर्यावरणपूरक, कमी-VOC फॉर्म्युलेशन वापरून तयार केले आहेत. ■ ■

### कार्मेल क्लासेसच्या १००% अधिग्रहनासह अरिहंत अकादमीचे अस्तित्व मजबूत

एनएसईमध्ये सूचीबद्ध कंपनी असलेल्या अरिहंत अकादमीने घोषणा केली की त्यांनी १.२ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सच्या करारात कार्मेल क्लासेस आणि कार्मेल ट्युशन्समधील १००% हिस्सा यशस्वीरित्या विकत घेतला आहे. या एकत्रीकरणाद्वारे, अरिहंत अकादमी त्यांच्या क्षमता आणखी मजबूत करते आणि वसई आणि संपूर्ण मुंबईत त्यांची पोहोच वाढवते.

या करारात जवळजवळ ३० कार्मेल वर्गखोल्यांच्या मोठ्या पायाभूत सुविधांचा समावेश आहे ज्या अरिहंतच्या पोर्टफोलिओमध्ये २०००+ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या आधारासह जोडल्या जातील; अशा प्रकारे, अरिहंत अकादमीची पोहोच आणि बाजारपेठेतील वाटा वाढवतील. शिवाय, या युतींमुळे विविध अभ्यासक्रम ऑफर वाढतील आणि राज्य मंडळ, सीबीएसई आणि आयसीएसई विभाग, इयत्ता आठवी, नववी आणि दहावीसाठी अभ्यासक्रम आणि विषयांची विस्तृत श्रेणी समाविष्ट होईल. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com